n Public Domain. Digitization by eGangotri.Fundin

हि.
३८६

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathma

Public Domain. Digitization by eGangotri.Fundin

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathma

n Public Domain. Digitization by eGangotri.Fundin

fि·३८६



al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathma

ic Domain. Digitization by eGangotri

n Public Domain. Digitization by eGangotri.Fundin

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ic Domain. Digitization by eGangotri.F



nskrit University, Balmeeki Campus, K

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

३८२२



वाल्मीकि परिसर
पुस्तकालय

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ic Domain. Digitization by eGangotri.F

nskrit University, Balmeeki Campus, K

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

ANGLO-MARÂTHÎ

TRANSLATION SERIES.

PART II.

BY

DWÂRKÂNÂTH RÂGHOBÂ TARKHADKAR.

SANCTIONED FOR USE UNDER

THE SECOND ANGLO-VERNACULAR STANDARD.

Tenth Edition.—20,000 Copies.

PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR "NIRNAYA-SÂGAR" PRESS,

Bombay:

1911.

All rights, including those of making a Key or Glossary and Translation, of this edition are reserved by the publisher.

Price 3 Annas.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri. Fund

(*Registered according to Act XXV of 1867.*)
[All rights reserved by the publisher.]

Published by Tukaram Javaji, Proprietor N. S. Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

Printed by B. R. Ghanekar, at the N. S. Press,
23, Kolbhat Lane, Bombay.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri Fundi

भाषांतरपाठमाला.

मराठी व इंग्रेजी.

भाग २.

हें पुस्तक,

द्वारकानाथ राघोबा तर्खडकर,

ह्यांनीं रचिलें.

सरकारी शाळांच्या दुसऱ्या आंग्लोव्हर्न्याक्युलर इयत्तेमध्यें भाषांतर शिकविण्यासाठीं मंजूर केलें असे.

दहावी आवृत्ति—२०,००० प्रती.

मुंबईत,

जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक **तुकाराम जावजी** यांनीं २३, कोलभाट लेन, येथें प्रसिद्ध केली.

सन १९११.

सर्व अधिकार प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत ३ आणे.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदिली असे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

शिक्षकास सूचना.

भाषांतरपाठमाला शिकवितांना प्रथम शिक्षकानें नियम, उदाहरणें व शब्द वाचवून घ्यावे. नियमांचा अर्थ मुलांस समजतो किंवा नाहीं हें विचारून पाहावें, व समजत नसला तर सांगावा. शब्द वाचवून घेतांना उपपदें, उच्चार, पदावरील जोर व वर्णरचना ह्यांकडे मुलांचें लक्ष लावावें. तसेंच, प्रत्येक शब्द व्याकरणदृष्ट्या कोणत्या जातीचा आहे, हें सांगावें. दुसऱ्या दिवशीं ह्याविषयीं मुलांस प्रथम प्रश्न करावे, व त्यांनीं धडा तयार केला असला तर भाषांतरपाठाचें भाषांतर त्यांच्याकडून तोंडीं करवून घ्यावें व नंतर दुसरा धडा सांगावा. भाषांतरपाठाचें तोंडीं भाषांतर केलें असेल तें मुलांला घरून वहींत लिहून आणावयास सांगावें व तें शिक्षकानें शुद्ध करून चुका मुलांस वर्गांत सांगाव्या. मागले शब्द कधीं कधीं विचारीत असावें व पुरवणींतील प्रश्न करावे. परीक्षेच्या दिवशीं नवीन प्रश्न काढून द्यावे व वाक्यें पुस्तकांतलीं देऊं नयेत—त्याच शब्दांवरून नवीन वाक्यें रचावीं. व्याकरणाकडे पहिल्यापासून लक्ष देत असावें व शब्दांची वर्णरचना नेहमीं विचारीत जावी.

---

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathi

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

अनुक्रमणिका.

धडा.		पृष्ठ.
१.	क्रियापदांविषयीं स्फुट विचार	१
२.	क्रियापदाचें अकरणरूप	५
३.	,, ,, (पुढें चालू)	७
४.	*To be* ह्याचें अकरणरूप	९
५.	*To have* ह्याचें अकरणरूप	१२
६.	प्रश्नरूपी वाक्यें	१५
७.	प्रश्नार्थक सर्वनामें	१८
८.	प्रश्नार्थक क्रियाविशेषणें	२३
९.	**चतुर्थी**	२५
१०.	**स्वतां**	३०
११.	विशेषणाचा तारतम्यभाव	३२
१२.	,, ,, (पुढें चालू) ...	३६
१३.	क्रियाविशेषणें	४०
१४.	क्रियाविशेषणाचा तारतम्यभाव	४४
१५.	आज्ञार्थ	४७
१६.	संबोधन	५१
१७.	भूतकाळीं क्रियापदें चालविण्याचे प्रकार	५२
१८.	*Strong Conjugation*	५७
१९.	पूर्णवर्तमान काळ	६६
२०.	शब्दयोगी अव्ययें	७०
२१.	,, ,, (पुढें चालू)	७५
२२.	,, ,, (पुढें चालू)	८२

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

२३. *There* ९३
२४. *Passive Voice* ९६
२५. मराठी प्रयोगांचें भाषांतर ९९
२६. किरकोळ वाक्यें १०३

पुरवणी.

१. शब्दविचाराचें संक्षिप्त वर्णन १०५
२. मराठी व इंग्रेजी भाषणाचे प्रकार ११४
३. प्रश्न ११६

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathi

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

भाषांतरपाठमाला.

भाग २.

धडा १.

क्रियापदांविषयीं स्फुट विचार.

१. कित्येक इंग्रेजी धातूंच्या अर्थाचे स्वतंत्र धातु मराठींत नाहींत. अशा प्रकारच्या धातूंबद्दल मराठींत **करणें, घेणें,** किंवा दुसरें एकादें क्रियापद कर्मासहवर्तमान घालावें लागतें. इंग्रेजी क्रियापद अकर्मक असलें तर मराठींत कर्मासहित **करणें, घेणें,** किंवा असलें दुसरें एकादें क्रियापद योजावें ह्मणजे झालें. परंतु सकर्मक असलें तर, इंग्रेजी वाक्यांतलें द्वितीयांत कर्म, अर्थाकडे लक्ष देऊन, मराठींत अन्य विभक्तींत घालावें; जसें—to sin **पाप करणें.**

He sins,	**तो पाप करतो.**
To hate,	**द्वेष करणें.**
He hates me,	**तो माझा द्वेष करतो.**

अशा प्रकारचीं कांहीं क्रियापदें खालीं दिलीं आहेत.

स्तुति करणें,	to praise. (प्रेज्.)	**नाश करणें,**	to de^{8}stroy^{IV}'.
दोष देणें,	to blame.	**पाणी घालणें, पाण्यावर नेणें,**	to wa^{4}'ter^{7}.
(आज्ञा) पाळणें,	to obey$^{10\ 2}$'.		
(आज्ञा) मोडणें,	to di^{6}sobey'.	**मदत करणें,**	to help. to assist'.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

प्रीति करणें,	to love.	भलत्या कामीं लावणें–शिवीगाळ देणें,	to abuse'.
करमणूक करणें, रंजावणें,	to amuse'.	पूजा करणें,	to wor'ship.
चिमटा घेणें,	to pinch.	प्रार्थना करणें,	to pray.
परीक्षा घेणें,	to exam'ine.	अभ्यास करणें,	to stud'y.
पराजय करणें,	to defeat'.	मुका-के घेणें,	to kiss.
आभार मानणें,	to thank.	शिफारस क०,	to recommend'.
हुकूम करणें,	to or'der.	संरक्षण करणें,	to protect'.
विश्वास ठेवणें,	to believe'.	खातरी करणें,	to convince'.
पसंत करणें,	to prefer'.	शपथ घेणें,	to swear.
		चित्र काढणें, रंग-देणें-लावणें,	to paint.*

२. to have ह्या क्रियापदासारखीं दुसरीं कांहीं क्रियापदें इंग्रेजींत आहेत; तीं अशीं कीं त्यांचें उद्देश्य मराठींत चतुर्थ्यन्त करून, कर्म असेल तें उद्देश्याच्या स्थानीं घालावें लागतें; जसें–to like, **आवडणें.**

I like milk, **मला दूध आवडतें.**

अशा प्रकारचीं कांहीं क्रियापदें खालीं दिलीं आहेत.

ठाऊक असणें,	to know.	सांपडणें, आढळणें,	to find.
वाटणें,	to think. to feel.	वहिम-अंदेशा-येणें,	to suspect'.
पाहिजे, गरज असणें,	to want.	आठवणें, स्मरणें,	to remem'ber.† to recollect'.

* To dye हें क्रियापद बहुतकरून कापडें रंगविण्याकडे लावतात. To paint हें चित्रें, भिंती, वगैरे पदार्थांला रंग देण्याकडे लावतात.

† To remember=आठवण असणें-ठेवणें-राखणें. To recollect=आठवणें, स्मरणें. पहिल्या शब्दाचा अर्थ आपोआप आठवण होणें असा होतो; दुसऱ्याचा अर्थ, ज्या गोष्टीचें विस्मरण पडलें आहें तिचें स्मरण करणें, असा होतो.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathr

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

परंतु, to know ह्याचा अर्थ **जाणणें**, to think चा **विचार करणें**, to feel चा **अनुभवणें**, to find चा **शोधून काढणें**, to suspect चा **कल्पना करणें, आणि** to recollect चा **स्मरण करणें**, असे अर्थ असतां मराठींत इंग्रेजीप्रमाणेंच प्रयोग होतो.

३. To flour'ish ह्याचे अर्थ **तरारणें, टवटवणें** किंवा **फोफावणें**, आणि **परजणें**, असे असतां, मराठींत इंग्रेजीप्रमाणेंच प्रयोग होतो; परंतु **भरभराट-आबादानी-तेजी असणें**, असा अर्थ असला तर, इंग्रेजींतील उद्देश्य मराठींत चतुर्थ्यंत किंवा षष्ठ्यंत करावें लागतें; जसें—

Trees flourish.

झाडें तरारतात.

He is flourishing his sword.

तो आपली तरवार परजीत आहे.

Trade is flourishing.

व्यापाराला तेजी आहे.

England is flourishing.

इंग्लंड देशाची भरभराट आहे.

४. To owe (**ओ**) **ऋणी** असणें, to cost **किंमत पडणें**, वगैरे पुष्कळ क्रियापदांचें भाषांतर वेगळ्या रीतीनें करावें लागतें; जसें—

He owes me two rupees.

तो माझे दोन रुपये देणें लागतो.

किंवा **त्याला माझें दोन रुपये देणें आहे.**

Such a coat costs five rupees.

अशा अंगरख्याला पांच रुपये पडतात.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

५. ☞ वरील उदाहरणांवरून साधारण असा नियम लक्षांत ठेवावा कीं, मराठीचें इंग्रेजी किंवा इंग्रेजीचें मराठी भाषांतर करतांना शब्दांच्या रूपांकडे लक्ष देऊन **शब्दशः** भाषांतर करण्याची वहिवाट ठेवावी हें चांगलें खरें; तथापि कित्येक स्थळीं असें केल्यानें निर्वाह होत नाहीं, ह्मणून भाषेच्या **मोडणी**कडे व **अर्था**कडे नेहमीं विशेष लक्ष द्यावें हें उत्तम.

६. शब्दसंग्रह १.

कायदा,	a law.[४]	व्यवस्था, बंदोबस्त,	or'der.
कायदे, धर्मशास्त्र,	law, the law.	आनंद पावणें,	to rejoice'.[IV]
हुकूम, आज्ञा,	an or'der.	चढणें,	to climb.[II] (क्लाइम्.)

भाषांतरपाठ १.

७—१. तो मुलगा आपल्या आईबापांच्या आज्ञा पाळील. २. वाईट मुलें आपल्या आईबापांच्या आज्ञा मोडतात. ३. मी कायद्यांच्या अभ्यास करीत असतों. ४. तो तुला दोष देईल. ५. त्यांच्या देशाची भरभराट होईल. ६. ते शहराचा नाश करतील. ७. मी आपल्या धन्याचा हुकूम बजावीन. ८. वानर झाडांवर चढत आहेत. ९. तो आपल्या मित्रांला मदत करील. १०. मी तिला मदत करीन. ११. ते तुमची शिफारस करतील. १२. तूं भिंतीवर चढत होतास. १३. मी त्याच्यावर विश्वास ठेवीत असतों. १४. हें मूल तुझी करमणूक करील. १५. आह्मी तुमची खातरी करूं. १६. ती तुझ्यावर प्रीती करते. १७. ते प्रार्थना करीत होते. १८. आह्मी परमेश्वराची पूजा करतों. १९. ते शूर लोक तुमचा पराजय करतील. २०. एक मनुष्य त्यांच्या घराच्या दरवाजांला रंग लावीत होता. २१. हा मुलगा मला चिमटे घेतो. २२. माळी

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathr

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

झाडांला पाणी घालील. २३. तो शपथ घेतो. २४. राजाला मुकुट शोभतो.

१. The good citizens were rejoicing; the bad were weeping. २. Our country will flourish. ३. I think so. ४. I am thinking. ५. I know this story. ६. I want your pen-knife. ७. He likes that book. ८. I thank you. ९. I love you. १०. I will praise good men. ११. Our friends will assist us. १२. He will examine you. १३. I will recommend you. १४. Walls protect a city. १५. A good boy obeys his parents. १६. They will obey the laws of their country. १७. He will obey my orders. १८. Some men disobey God and the laws. १९. Your father will blame you. २०. They were destroying the villages.

धडा २.

क्रियापदाचें अकरणरूप.

८. **क्रियापदाचें अकरणरूप** साधावयाचें असल्यास, ह्मणजे क्रियेचा निषेध दाखवावयाचा असल्यास, not (**न**) हें क्रियाविशेषण किंवा (no **कोणी–कांहीं–न**) हें विशेषण योजावें.

९. अपूर्णवर्तमान, अपूर्णभूत व भविष्यकाळ, ह्यांच्याप्रमाणें ज्या काळांचीं रूपें सहाय क्रियापदांच्या योगानें सिद्ध होतात, त्यांचें अकरणरूप साधावयाचें असल्यास not हा शब्द सहाय क्रियापदाच्या पुढें घालावा; जसें—

He is *not* coming,	**तो येत नाहीं.**
He was *not* coming,	**तो येत नव्हता.**
He will *not* come,	**तो येणार नाहीं.**

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

१०. शब्दसंग्रह २.

दुखविणें, दुखापत करणें,	to hurt.	वाहणें, फुंकणें, वाजविणें,	to blow.
चाबूक मारणें,	to whip.	(शर्यतींत) जिंकणें,	to win.
फाडणें,	to tear.	(देश) जिंकणें,	to con'quer.
हांकणें,	to drive.	हलवणें,	to shake.
रांगणें,	to creep.	गमावणें, हरवणें,	to lose (लूज्).
सरपटणें,	to crawl.	स्पर्श,	touch.
वारा,	wind.	स्पर्श करणें,	to touch.
लढाई,	a battle.	दिवा,	a light.
तुतारी,	a trum'pet.	(दिवा) लावणें, उजेड देणें,	to light.
गाडी,	a car'riage.	विसरणें,	to forget'.
गाडा, गाडी,	a cart.	गाडीवान,	a coach'man. a cart'man.
मेणबत्ती,	a wax-can'dle.		
कंदील, फाणस,	a lan'tern.		
तुकडा,	a piece, a bit.		

भाषांतरपाठ २.

११—१. The wind was *not* blowing. २. He was blowing a trumpet. ३. That child does *not* creep. ४. He will *not* tear my coat. ५. The dogs were *not* barking. ६. I will *not* forget my friends. ७. You are *not* studying. ८. You will win the battle. ९. They will conquer your country. १०. He will *not* win the money. ११. You will lose your money. १२. Ho will beat that disobedient boy. १३. The coachman will drive our carriage. १४. You are *not* lighting the lamps. १५. The servant will light these candles. १६. He will *not* touch your money. १७. I want a light. १८. This candle will *not* burn. १९. The child is burning that piece of paper. २०. You will shake my table. २१. We shall *not* eat raw fruit. २२. The ship is *not* sinking. २३. It will *not* hurt

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathr

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

your fingers. २४. The boys were *not* learning their lessons. २५. My father will *not* call the husbandman's daughter.

१. तूं वाचीत नव्हतास. २. त्या मुली लोंकर पिंजीत नाहींत. ३. मी फुलें तोडीत नाहीं. ४. मूल रडत नव्हतें. ५. आह्मी गुडघे टेंकीत नव्हतों. ६. ते लढाई मारतील. ७. तुह्मी न्हात नव्हतां. ८. तो शिकणार नाहीं. ९. त्या भांडणार नाहींत. १० गाडा येत आहे. ११. तो आमचा कंदील आहे. १२. आह्मी बोलत नव्हतों. १३. शेतकरी शेत नांगरीत नव्हता. १४. गाईचीं शिंगें वासराला दुखविणार नाहींत. १५. मूल रांगत आहे. १६. वारा वाहत नाहीं. १७. गाडीवान बैलाला हांकीत आहे. १८. मी त्या पक्ष्याला पकडीत नव्हतों. १९. तो काम करणार नाहीं. २०. गाडीवान घोड्याला चाबूक मारीत आहे. २१. मी तें पुस्तक हरवणार नाहीं. २२. तूं ते पैसे हरवशील. २३. तो उद्योगी होणार नाहीं. २४. तूं दुःखी असणार नाहींस. २५. माझें जुनें पागोटें हिरव्या रंगाचें होतें.

धडा ३.

अकरणरूप (पुढें चालू).

१२. वर्तमान काळाप्रमाणें ज्या काळीं सहाय क्रियापद नसतें, त्या काळीं अकरणरूप साधावयाचें असल्यास do हें सहाय क्रियापद योजावें* व त्याच्या पुढें not हा शब्द घालावा. उदाहरण—

---

* कवितेंत बहुतकरून नेहमीं व अलंकारी भाषेंत कधीं कधीं, do ह्याची गरज नसते व not हा शब्द क्रियापदाच्या पुढें घालतात; जसें —He comes not, तो येत नाहीं.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

To write ह्याचा वर्तमानकाळ, अकरणरूप.

१. I do not write.	मी लिहीत-नाहीं-नसतों.*
२. Thou dost † not write.	तूं लिहीत नाहींस.
३. He, she, it, does not write.	तो, ती, तें लिहीत नाहीं.

अनेकवचन.

१. We do not write.	आह्मी लिहीत नाहीं.
२. You do not write.	तुह्मी लिहीत नाहीं.
३. They do not write.	ते, त्या, तीं, लिहीत नाहींत.

१३. शब्दसंग्रह ३.

पुरणें,	to bur'y.[५ ८]	हिंदु,	a Hin'du.[८ १२]
आच्छादणें, झांकणें,	to cov'er.[७ ७]	शरीर,	the bod'y.[९ ८]
झांकण आच्छादन } काढणें,	to uncov'er.[७]	प्रेत,	a corpse.[४]
उघडणें,	to o'pen.[१०]	वेस, फाटक, दरवाजा, }	a gate.§
सजीव, जीवंत,	alive', liv'ing.‡[७ ११ ८ ८]	मेलेला-ली-लें,	dead.[५]

भाषांतरपाठ ३.

१४—१. हे लोक दारू पीत नाहींत. २. हें मूल दूध पीत नाहीं. ३. तूं विचार करीत नाहींस. ४. तो माझीं पत्रें उघडीत नाहीं. ५. मी आपले अपराध लपवीत नसतों. ६. तूं

---

* I am not writing व I do not write ह्याचें 'मी लिहीत नाहीं' असें सारखेंच भाषांतर होतें.

† भा० १, क० १६, टीप पहा.

‡ Living ह्याच्या पुढें बहुतकरून नाम असतें, परंतु alive हा शब्द क्रियापदाच्या पुढें असतो व त्याला नामाची गरज नसते; जसें—

This is a *living* animal, हा जिवंत प्राणी आहे.

This animal is *alive*, हा प्राणी जिवंत आहे.

§ घराच्या दरवाज्याला door व शहरांत, खेडेगांवांत, बागांत किंवा आवारांत जाण्याच्या दरवाज्याला gate हा शब्द लावतात.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathr

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

आपले हात धूत नाहींस. ७. ते प्रार्थना करीत नाहींत. ८. तो ऐकत नाहीं. ९. ते लोक सजीव प्राण्याला ठार मारीत नाहींत. १०. त्याचे मित्र त्याला मदत करीत नाहींत. ११. व्यापाराला तेजी नाहीं. १२. वाईट मुलें आपल्या आईवापांच्या आज्ञा पाळीत नाहींत. १३. वाईट लोक आपल्या देशावर प्रीति करीत नाहींत. १४. मी चाकराला दोष देत नाहीं. १५. तो वाघाला भीत नाहीं.

१. Hindus *do nct* eat beef. २. He *does not* read bad books. ३. The servant *does not* open the door. ४. A lion *does not* fear a fox. ५. You *do not* obey my orders. ६. He is covering the body of his dead father. ७. We *do not* uncover our heads. ८. You *do not* open the letters. ९. He *does not* open his book. १०. We *do not* shut the gate of the city. ११. He was shutting the gate of the garden.

धडा ४.

To be ह्याचें अकरणरूप.

१५. वर्तमान व भूतकाळीं to be ह्याचें अकरणरूप not हा शब्द क्रियापदाच्या पुढें घातल्यानें सिद्ध होतें; जसें—

He is *not* happy,	तो सुखी नाहीं.
He was *not* happy,	तो सुखी नव्हता.
I am *not* the man,	मी नव्हे तो मनुष्य.
It is *not* my book,	तें माझें पुस्तक नव्हे.
This is *not* Râma's book,	हें रामाचें पुस्तक नव्हे.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

१६. To be ह्याच्या पुढें नुसतें नाम असलें व त्यावरून एकाद्याच्या धंद्याचा अगर रोजगाराचा बोध होत असला तर, not ह्या क्रियाविशेषणाबद्दल no हें विशेषण घालण्याचाही प्रघात आहे; जसें—

He is *not* a soldier,

किंवा He is *no* soldier.

परंतु ह्या दोन्ही वाक्यांचा अर्थ सारखा होत नाहीं. पहिल्या वाक्याचा अर्थ **'तो शिपाई नाहीं'** ह्मणजे त्याचा धंदा शिपायाचा नव्हे. दुसऱ्या वाक्याचा अर्थ **'तो चांगला शिपाई नाहीं'** ह्मणजे त्याला शिपायाचें काम चांगलें येत नाहीं.*

१७. शब्दसंग्रह ४.

शुद्ध, स्वच्छ,	pure. (VIII)	प्रामाणिक	hon'est. (९ ५)
अशुद्ध, मिसळीचा,	impure'. (८)	अप्रामाणिक, लबाड,	dishon'est.
वेचव,	taste'less. (२ ५)	दोष, बोल, / दोषारोपण,	blame.
वर्णहीन,	col'ourless. (७ ७)	स्तुति,	praise.
वासरहित,	o'dourless. (१० ७)	दोषीपणा, सदोषता,	guilt. (८)
लठ्ठ,	fat.	दोषी, अपराधी,	guilt'y.
रोडका-की-कें,	lean. (६)	नफा,	a prof'it. (९)
बरा-री-रें,	well. †	तोटा,	a loss. (४)
आजारी,	unwell'.		
धनवान्, श्रीमान्,	weal'thy. (५ ८)	बक्षीस, इनाम,	a reward'. (८ ४) ‡ / a prize.

* कित्येक स्थळीं हा भेद राखलेला आढळत नाहीं.

† Well हा शब्द बरा ह्या अर्थानें पाहिजे तेथें लागतो; परंतु unwell हा शब्द शरीरप्रकृतीला मात्र लावतात. हे दोन्ही शब्द क्रियापदाच्या पुढें येतात.

‡ Reward ह्मणजे उत्तम प्रकारें चाकरी बजाविल्यानें किंवा उपकार केल्यानें मिळालेलें बक्षीस. Prize ह्मणजे युद्धांत किंवा कोणत्याही प्रकारच्या चढाचढीच्या कामांत गुणाधिक्य दाखवून मिळविलेलें बक्षीस.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

मिळविणें,	to get.	बातमी, खबर,	news.*
वाहणें, साहणें,	to bear.	द्रव्य, संपत्ति,	rich'es,† wealth.
व्यापारी,	a mer'chant.		
शेजारी,	a neigh'bour.		
वस्तरा,	a ra'zor.	अंगुस्तान,	a thim'ble.

भाषांतरपाठ ४.

१८—१. His garden is *not* beautiful. २. His uncle is *un*well. ३. Our house is *not* large. ४. Pure water is tasteless. ५. It is colourless and odourless. ६. He will bring good news. ७. This is bad news. ८. He is *not* a wealthy man. ९. Our neighbour is *not* a good man. १०. It is *not* your fault. ११. Your son will *not* win the prize. १२. The good man will get a reward. १३. The merchant will get a profit. १४. They will get riches. १५. He will bear the blame. १६. You are *not* guilty. १७. He is *not* a carpenter. १८. He is *no* carpenter. १९. That man is *not* a gardener. २०. This is not the house. २१. It is *not* a lion. २२. It is *not* your waistcoat. २३. The water of your well is *not* pure. २४. The boy is *not* fat. २५. This is *not* pure gold.

१. त्याचे मुलगे उद्योगी नाहींत. २. हा वस्तरा तीक्ष्ण नाहीं. ३. तो बोंथट आहे. ४. तुझा चाकू बोंथट नाहीं. ५. कांहीं पुरुष धीट नसतात. ६. कांहीं मुलें भित्रीं नसतात. ७. हीं फळें कच्चीं नाहींत. ८. कांहीं फळें कडू नसतात.

---

* News हा शब्द अनेकवचनी असून त्याचा एकवचनी शब्दासारखा प्रयोग होतो. त्याला उपपद लागत नाहीं, तथापि त्याच्या पूर्वीं the हें उपपद येऊ शकतें.

† Riches हा शब्द एकवचनी असून त्याचा अनेकवचनी शब्दासारखा प्रयोग होतो.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

९. कांहीं माणसें लठ्ठ असतात व कांहीं नसतात. १०. कांहीं तरुण पुरुष मरतात. ११. तो आपलें तोंड दाखवीत नाहीं. १२. मी व्यापारी नाहीं. १३. तो व्यापारी प्रामाणिक नाहीं. १४. त्याचा शेजारी प्रामाणिक मनुष्य आहे. १५. तिचा नवरा आर्विष्ठ मनुष्य आहे. १६. कांहीं श्रीमंत लोक प्रामाणिक नसतात. १७. पुष्कळ गरीब लोक सुखी असतात. १८. हें माझें पागोटें नव्हे. १९. हें पागोटें माझें नव्हे. २०. तो माझा मित्र नाहीं. २१. हें नव्हे तें दुकान. २२. ही लेखणी तुझी नव्हे. २३. हें पक्ष्याचें घरटें नव्हे. २४. ते लढत नव्हते. २५. मी तुझें संरक्षण करणार नाहीं.

धडा ५.

To have ह्याचें अकरणरूप.

१९. वर्तमान काळीं आणि भूत काळीं To have ह्याचें अकरणरूप कर्तव्य असतां no हा शब्द योजावा; जसें—

He has *no* book.

त्याच्या जवळ पुस्तक नाहीं.

२०. परंतु कर्माच्या पूर्वीं दुसरा एखादा शब्द असला तर बहुतकरून not हा शब्द योजावा लागतो; जसें—

I have *not* your book.

मजजवळ तुझें पुस्तक नाहीं.

२१. ☞ व्यावहारिक भाषेंत वर्तमान व भूत काळीं करणरूपीं व अकरणरूपीं to have ह्याच्या पुढें got हा शब्द घालण्याची चाल पडली आहे. Got हें to get ह्या क्रियाप-

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

दाचें कर्मवाचक धातुसाधित आहे, व त्याचा मूळ अर्थ **मिळविलेला-ली-लें** असा आहे; परंतु तें to have ह्याच्या पुढें असलें ह्मणजे त्याचा अर्थ कांहींच होत नाहीं—to have व to have got ह्यांचा **जवळ असणें** असा सारखाच अर्थ होतो; जसें—

I *have* no corn,
किंवा I *have got* no corn.
मजजवळ धान्य नाहीं.
I *have* not Râmâ's book,
किंवा I *have* not *got* Râmâ's book.
मजजवळ रामाचें पुस्तक नाहीं.

२२. शब्दसंग्रह ५.

सद्गुण,	vir'tue.	सद्गुणी,	vir'tuous.
दुर्गुण, दुराचार,	vice.	दुराचारी,	vi'cious.*
		उपयोगी,	use'ful.
टांचणी,	a pin.	निरुपयोगी,	use'less.
सुई,	a nee'dle.	भुकेला-ली-लें,	hun'gry.
लोक,	peo'ple.	तहानेला-ली-लें,	thirst'y.
धनगर,	a shep'herd. (शेपर्ड.)	बक्षीस देणें,	to reward'.
		शिक्षा करणें,	to pun'ish.

भाषांतरपाठ ५.

२३—१. पंतोजी वाईट मुलांस शिक्षा करतो. २. मजजवळ टांचणी नाहीं. ३. मजपाशीं टांचण्या नाहींत. ४. तुझ्या घराला मोठाले दरवाजे नाहींत. ५. त्याच्या पाशीं दऊत नाहीं.

* *Cious* आणि *tious* ह्यांचा उच्चार शस्.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

६. माझ्या पाशीं तुझा अंगरखा नाहीं. ७. माझ्या पाशीं तुझी जुनी छत्री नाहीं. ८. तुझ्या पाशीं माझें नवें पुस्तक आहे. ९. त्याच्या पांच गाई आहेत. १०. त्याच्या जवळ तुझीं पुस्तकें नाहींत. ११. तिच्या जवळ सुया नाहींत. १२. तो आमचा खरा मित्र नाहीं. १३. तो विश्वासू चाकर नाहीं. १४. हें त्याचें दुकान नव्हे. १५. त्या झाडाला पानें नाहींत. १६. त्याला मुली नाहींत. १७. त्या गरीब मनुष्याला झोंपडी नाहीं. १८. त्या घराच्या भिंती मजबूत नाहींत. १९. त्याला मोठाल्या खिडक्या नाहींत. २०. ती गाय दूध देत नाहीं. २१. त्या आंधळ्या मुलाला आईबाप नाहींत. २२. मी भुकेला नाहीं. २३. तो तहानेला नव्हता. २४. सद्गुणी मनुष्यें पाप करीत नाहींत. २५. त्याला बक्षीस मिळणार नाहीं.

१. The sheep have *no* shepherd. २. He has *no* sister. ३. Pure water has *no* taste. ४. You have *no* ruler. ५. You have many needles and pins. ६. This lamp has *no* oil. ७. Some flowers have *no* smell. ८. The barber has a sharp razor. ९. God rewards virtuous persons. १०. He punishes wicked people. ११. They have *no* horses. १२. I have *no* friends. १३. I have got *no* money. १४. I have *not* got your pen-knife. १५. The rich merchant has *no* son. १६. You will get *no* profit. १७. This ink is useless. १८. I have got a piece of paper. १९. You have got many useful books. २०. You have got a wealthy neighbour.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

धडा ६.

प्रश्नरूपी वाक्यें.

२४. **प्रश्न** करावयाचा असल्यास वाक्यांत सहाय क्रियापद असलें तर तें उद्देश्याच्या पूर्वीं घालावें व वाक्याच्या शेवटीं प्रश्नचिन्ह मांडावें; जसें—

Is he coming ? **तो येत आहे काय ?**
Was he coming ? **तो येत होता काय ?**
Will he come ? **तो येईल काय ?**

२५. वर्तमान व भूत काळीं सहाय क्रियापद नसतें ह्मणून तेथें do हें सहाय क्रियापद योजावें व तें उद्देश्याच्या पूर्वीं घालावें; जसें—

Does he come ? **तो येतो काय ?**
Did he come ? **तो आला काय ?**

२६. वर्तमान व भूत काळीं to be व to have हीं क्रियापदें, प्रश्न कर्तव्य असतां उद्देश्याच्या पूर्वीं घालावीं; जसें—

Is he happy ? **तो सुखी आहे काय ?**
Had he a son ? **त्याला मुलगा होता काय ?**

२७. प्रश्नांचें उत्तर **होय** असलें तर yes असें ह्मणावें, व **नाहीं** असें असलें तर no ह्मणावें.* अशा ठिकाणीं no हें क्रियाविशेषण आहे, व त्याचा अर्थ **नाहीं** असा होतो. परंतु मागल्या चार धड्यांत no हा शब्द सांगितला, तें विशेषण आहे व त्याचा अर्थ **न** असा जाणावा.

---

* परंतु हें लक्षांत ठेवावें कीं ज्या ज्या ठिकाणीं मराठींत आपण होय किंवा नाहीं असें ह्मणतों त्या त्या ठिकाणीं इंग्रेजींत यथाक्रमें yes किंवा no घालतात, असें नाहीं.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

२८. मराठीप्रमाणें इंग्रेजींत प्रश्नांचा चार प्रकारचा उपयोग होतो.—१. खबर किंवा बातमी कळण्याकरितां. २. दुसऱ्याची संमती घेण्याकरितां. ३. परवानगी घेण्याकरितां. ४. विनंती करण्याकरिता किंवा कांहीं काम करावयास सांगण्याकरितां. उदाहरणें—

१. Is he swimming ?	तो पोहत आहे काय ?
२. Are we not mortal ?	आपण मरणाधीन नाहीं काय ?
३. Shall I go ?	मी जाऊं का ?
४. Will you kindly go there ?	कृपा करून तेथें जातोस काय ?

☞ चवथ्या कारणास्तव प्रश्न करतांना इंग्रेजींत भविष्य काळ घालतात; परंतु मराठींत ती क्रिया लागलीच किंवा पुढें करायाची असेल त्याप्रमाणें वर्तमान किंवा भविष्य काळ असतो; जसें—

Will you light this lamp ?
एवढा दिवा लावतोस काय?
Will you come to-morrow ?
उद्यां येशील का ?

२९. शब्दसंग्रह ६.

ताजा-जी-जें,	fresh.*	रुचकर,	deli'cious.
शिळा-ळी-ळें,	stale.		
खरा, नेक, बरोबर,	right.	थंड,	cold.
अयोग्य, गैरशिस्त,	wrong.	ऊबदार, गरम,	warm.
		कोमट,	luke'warm.

* *Fresh* water=गोडें पाणी.

Gurukul Kangri University Haridwar. Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

सुख,	pleas'ure.*	उष्णता, गरमी,	heat.
दुःख,	pain.	थंडी,	cold, cold'ness.
वर्ष,	a year.	ऊब,	warmth.
विंचरणें,	to comb. (कोम्.)	ऋतु,	a season. (सीजन.)
वस्तु, पदार्थ, गोष्ट,	a thing.	वसंत,	spring.
(कांचेचा) प्याला,	a glass.	उन्हाळा,	sum'mer.
ताट,	a plate, a dish.	पावसाळा,	the rainy season.
भरलें ताट, पक्वान्न,	a dish.	हिंवाळा,	win'ter.

भाषांतरपाठ ६.

३०.—१. *Are* not our bodies warm? २. *Has* your brother many books? ३. *Is* not the heat of summer great? ४. *Is* it a large cellar? ५. *Is* that your sister's thimble? ६. *Is* he a disobedient son? ७. *Will* you *take* this glass of milk? ८. *Do* you *take* tea? ९. *Do* you *know* that man? १०. *Does* he *like* milk? ११. *Will* you *light* the candle? १२. *Does* not your mother *like* coffee? १३. *Do* you *like* this dish? १४. *Is* it not a delicious dish? १५. *Are* you ill? १६. *Will* you *mend* this pen? १७. *Were* they not *writing*? १८. *Do* not children *like* sugar? १९. *Is* not spring one of† the four seasons of the year? २०. *Do* we not *drink* fresh water? २१. *Is* not sea-water salt? २२. *Do* you *like* the cold of winter? २३. *Is* the water lukewarm? २४. *Have* you no sister? २५. The bodies of living animals are warm.

१. तूं बोलत नव्हतास का? २. त्याला बोलावतोस का? ३. तेवढी लेखणी आणतोस का? ४. तो येणार नाहीं काय?

---

* शब्दाच्या शेवटल्या *sure* ह्याचा उच्चार बहुधा जर् असा होतो.

† Of ह्याचा अर्थ कधीं कधीं पैकीं, मध्यें असा होतो.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

५. तुला हीं फळें आवडत नाहींत काय? ६. तें दूध थंड आहे. ७. मला मोठें सुख वाटतें. ८. तुला ताक आवडत नाहीं काय? ९. मी वाचीत नव्हतों का? १०. तूं खेळत नव्हतास का? ११. त्याचें पागोटें हिरवें होतें? १२. तो तुझा द्वेष करतो काय? १३. तूं जात नव्हतास का? १४. ती नदी खोल आहे काय? १५. मद्रास हें मोठें शहर आहे काय? १६. त्याच्या जवळ जुगदान नाहीं काय? १७. त्या दरवाज्याला मूठ नाहीं काय? १८. तुजजवळ घड्याळ नाहीं का? १९. तुझे हात थंड आहेत. २०. तुला ताजें दूध मिळतें का? २१. तुला ही वस्तु* पाहिजे का? २२. तुला असें वाटतें? २३. तुला ही गोष्ट ठाऊक आहे काय? २४. तुला ही गोष्ट आवडते? २५. मला आठवत नाहीं. २६. ती आपले केंस विंचरीत आहे. २७. तो लिहीत नव्हता का? २८. मला असली गोष्ट आवडत नाहीं. २९. असलें अंबट फळ तूं खाशील का? ३०. ही गोष्ट गैरशिस्त आहे.

धडा ७.

प्रश्नार्थक सर्वनामें.

३१. इंग्रेजींत **प्रश्नार्थक सर्वनामें** तीन आहेत— Who,[११]† **कोण**, ष० Whose,[१२] **कोणाचा**, द्वि० Whom,[१२] **कोणाला.**

Which,[६]† **कोणता.**

---

* कधीं कधीं वस्तु किंवा गोष्ट हा शब्द सोडून नपुंसकलिंगी सर्वनाम इंग्रेजींत ठेवलें तरी चालतें. मराठींत देखील हा प्रकार पुष्कळ आढळतो.

† ह्या शब्दांतल्या *h* चा उच्चार होत नाहीं ह्मटलें तरी चालेल.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fundi

What,* **काय, कसचा-ला, कोण, कोणता, कोठला.**

३२. हीं सर्वनामें नेहमीं वाक्याच्या आरंभीं असतात; जसें—

What are you doing?

तूं काय करीत आहेस?

ह्या वाक्यांत What हें are doing ह्या क्रियापदाचें कर्म आहे.

३३. Who हा शब्द एखाद्या व्यक्तीचें **नांव** किंवा **दुसरी कांहीं माहिती** विचारण्याकरितां योजतात. त्याच्या पुढें नाम येत नाहीं; जसें—

Who is this man?

हा मनुष्य कोण आहे?

३४. **नियमित संख्येंतील एका किंवा कांहीं** व्यक्तींविषयीं बोलण्याकडे which हा शब्द लावतात. त्याच्या पुढें नाम कधीं असतें, व कधीं नसतें; जसें—

Which man is it?

तो कोणता मनुष्य आहे?

Which is your house?

तुझें घर कोणतें?

३५. What हा शब्द बहुदा नपुंसकलिंगी असतो, परंतु कधीं कधीं तो पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी आढळतो. त्याच्या पुढें नाम कधीं असतें व कधीं नसतें. पुल्लिंगी what हा शब्द एखाद्या व्यक्तीचा **धंदा** अगर त्याच्या **गुणाचें, स्वभावाचें,** किंवा **स्वरूपाचें वर्णन** जाणण्याकरितां योजतात; उदाहरणें—

* ह्या शब्दांतल्या *h* चा उच्चार होत नाहीं ह्मटलें तरी चालेल.

al Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

What is he ? त्याचा धंदा कोणता ?
What poem is this ? कसली (किंवा कोणती) कविता आहे ही ?
What boys are these ? हीं कोठलीं मुलें ? कोणतीं मुलें हीं ?

३६. *Which* man is this ? आणि *What* man is this ? ह्या दोहोंपैकीं पहिल्या वाक्यांत which ह्या शब्दानें विचारणाराला कांहीं पुरुष ठाऊक आहेत त्यांपैकीं हा एक आहे, अशा अर्थाचा बोध होतो; दुसऱ्या वाक्यांत what ह्या शब्दावरून असें समजतें कीं, तो पुरुष विचारणाराला मुळींच ठाऊक नाहीं व त्याची कांहीं तरी माहिती त्याला पाहिजे आहे.

३७. शब्दसंग्रह ७.

वैद्य,	a doc'tor, a physician.	खोदकाम करणारा,	a sculp'tor.* an engrav'er.
पाद्री,	a cler'gyman.		
धर्मोपदेशक,	a priest.	कप्तान,	a cap'tain.
वकील,	a law'yer.		
इंजनेर,	an engineer'.	दुकानदार,	a shop'keeper.
गवई,	a sing'er.	गिऱ्हाईक,	a customer.
कामगार,	an of'ficer.	वाणी,	a gro'cer.
कारकून,	a clerk.	सुतार,	a join'er. †
कागद वगैरे विकणारा,	a sta'tioner.	तावदार बसविणारा,	a gla'zier. (ग्लेझर.)

* Sculptor=खोदून दगडाच्या मूर्ति किंवा पुतळे तयार करणारा; engraver=दगड, धातु, वगैरे कठीण पदार्थांवर अक्षरें, आकृति किंवा नकशी कोरणारा.

† Carpenter=घर बांधण्याचें मुख्य सुतारकाम करणारा; joiner =लांकडी जिने, फडताळें वगैरे किरकोळ काम करणारा.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

शिल्पशास्त्री,	an ar'chitect. (ch=क्.)	तागाचें कापड विकणारा,	a lin'en-draper.
कारागीर,	an art'ist.* / an art'isan. / a work'man.	पाथरवट,	a stone'-cutter.
		चौकट,	a frame.
		हातमोजा,	a glove.
मजूर,	a la'bourer.	नांव,	a name.
घड-ठोक-काम करणारा,	a smith.	रुमाल,	a hand'kerchief. †
		जोडा,	a shoe.
सोनार,	a gold'smith.	खाटीक,	a butch'er.
कांसार,	a cop'persmith.	कोळी,	a fish'erman.
लोहार, धिसाडी,	a black'smith. / an i'ronsmith.	गंधी,	a perfu'mer.
		खलाशी,	a sail'or.
लेखक	a wri'ter.	शेतकरी,	a farm'er.
इमारत,	a build'ing.	चक्की,	a mill.
जिनगर,	a sad'dler.	चक्कीवाला,	a mill'er.
गवंडी,	a brick'layer.	पाणचक्की,	a wa'ter-mill.
चांभार,	a shoe'-maker.	पवनचक्की,	a wind'mill.
हलवाई,	a confec'tioner.	घोट्यापेक्षां उंच जोडा,	a boot.

भाषांतरपाठ ७.

३८—१. तूं कोणाचा मुलगा ? २. तुझा उजवा हात कोणता व डावा हात कोणता ? ३. चांभार जोडे (तयार) करतो. ४. आमचा गवळी ताजें दूध आणतो. ५. माळ्याजवळ

---

* चितारी, खोदकाम करणारे, गवई, शिल्पकार, वगैरे कारागिरांस artists ह्मणतात. त्यांच्या कामाला बुद्धिचातुर्य, हस्तकौशल्य हीं दोन्ही लागतात. केवळ हस्तकौशल्याचीं कामें करणारे जे कारागीर त्यांस artisans ह्मणतात. कोणत्याही प्रकारचें हातानें करावयाचें सार्धे काम करणाऱ्या लोकांस workmen ह्मणतात. हा शब्द विगाऱ्यांसही लावतात.

† ह्या शब्दांतील d चा उच्चार करूं नये. तसेंच handsome व Wednesday ह्या शब्दांतील *d* चा उच्चार होत नाहीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

सुंदर फुलें आहेत. ६. तुला ह्या बंडीचा रंग आवडतो काय ? ७. तो चांगला वैद्य आहे काय ? ८. बागेचा दरवाजा कोण उघडील ? ९. ह्या पुस्तकांपैकीं तुला कोणतें आवडतें ? १०. त्या मुलांपैकीं कोण कोण पोहत होते ? ११. ह्या दुकानदाराचीं गिऱ्हाइकें पुष्कळ आहेत. १२. ह्या जोड्यांपैकीं तुझा कोणता ? १३. तुह्यांला कोणते पक्षी आवडतात ? १४. कोणत्या वृक्षांला मोठालीं पानें असतात ? १५. ह्या तळ्याचें नांव काय ? १६. तुझ्या भावाच्या मित्राचें नांव काय ? १७. गवंडी काय काम करीत होते ? १८. ह्या घराची उंची काय आहे ? १९. हे कोणाचे हातमोजे आहेत ? २०. तो काय विचारितो ? २१. कसलें लांकूड हें ? २२. माझ्या पुस्तकांपैकीं तुला कोणतें आवडतें ? २३. खाटीक मांस विकतो. २४. कोळी मासे पकडतो व ते विकतो. २५. तुमच्या मुलांस कोण शिकवितो ?

१. *Who* am I? २. *What* is my name? ३. *Who* art thou? ४. *Who* is he? ५. *Who* are these women? ६. *Who* is it? ७. *Which* woman is it? ८. *What* book is this? ९. *What* have you? १०. *What* do you say? ११. *What* was he doing? १२. *What* does a linen-draper sell? १३. He sells linen, gloves, handkerchiefs, &c.* १४. *What* does the joiner make? १५. He makes doors, window-frames, cupboards, &c. १६. Our miller has two mills—a water-mill and a wind-mill. १७. Will your servant go to the grocer's shop? १८. I want some coffee, tea and sugar. १९. *What* does a carpenter make? २०. He builds

५ ७३

* &c. हा लातिन भाषेंतील et cetera ह्याचा संक्षेप आहे. त्याचा अर्थ इंग्रेजींत and other things ह्मणजे इत्यादि असा होतो.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

houses, bridges, ships, &c. २१. That young painter is a good artist. २२. *What* does a butcher sell? २३. *What* fruit have we? २४. *Who* is that officer? २५. Is he the captain of the ship? २६. *What* ship is that? २७. *Which* of the cows gives no milk? २८. *Which* of these buildings do you like? २९. *Which* of these boys was abusing you? ३०. *Who* makes boots and shoes? ३१. *What* do horses and cows eat? ३२. *What* do tailors make? ३३. *What* are these men, women and children doing? ३४. *Which* boy was reading that bad book? ३५. A stationer sells paper, ink, inkstands, pencils, &c.

धडा ८.

प्रश्नार्थक क्रियाविशेषणें.

३९. **मुख्य प्रश्नार्थक क्रियाविशेषणें** पांच आहेत. तीं खालीं दिलीं आहेत—

केव्हां, कधीं, when.* **कसा-शी-सें** how. **कोठें, कोणीकडे,** where*. **कां, कशासाठीं,** why किंवा where'fore.* **कोठून,** whence.*

४०. प्रश्नार्थक सर्वनामांप्रमाणें हे शब्द नेहमीं वाक्याच्या आरंभीं असतात; जसें—

When will he come?

तो केव्हां येईल ?

हे शब्द घालतांना कलमें २४, २५ व २६ ह्यांतील नियमांकडे विशेष लक्ष द्यावें.

---

* ह्या शब्दांतल्या *h* चा उच्चार होत नाहीं ह्मटलें तरी चालेल.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

४१. शब्दसंग्रह ८.

उगवणें,	to rise.	सकाळचें जेवण, न्याहारी,	break'fast.
मावळणें,	to set.	दुपारचा फराळ,	tif'fin.
ह्मणणें,	to say.	संध्याकाळचें मुख्य जेवण,	dinner.
नाव,	a boat.	रात्रीचें जेवण,	sup'per.
टोपली,	a bask'et.	फराळ,	lunch'eon.
काठी,	a stick.	सकाळचें भोजन करणें, किंवा न्याहारी करणें,	to break'fast.
पांघुरणें ठेवायाचें कपाट,	a ward'robe.	संध्याकाळचें भोजन करणें,	to dine.
किती,	how ma'ny. how much.*	रात्रीचें भोजन करणें,	to sup.
तयार,	read'y.		
जेवण,	a meal.		

भाषांतरपाठ ८.

४२—१. *When* does the sun rise? २. *When* does it set? ३. *Where* are you going? ४. *Where* does your master live? ५. *When* do you take your meals? ६. *Whose* stick is this? ७. *Why* do you not learn your lesson? ८. *Where* is your wardrobe? ९. *How* are you? १०. *How* do you know that? ११. *When* does your barber come? १२. *When* will you do it? १३. *Whence* do they come? १४. *Wherefore* do you rejoice? १५. *Why* do you run? १६. *Why* do you say so? १७. *Where* shall we play? १८. *How* is that? १९. Are you hungry? २०. *Where* is he? २१. *Where* do you live? २२. You are right.† २३. Will you not see those beautiful flowers? २४. *Where* do you keep your clothes? २५. *Where* shall I place this basket?

---

* How many हें संख्या आणि how much हें प्रमाण दाखवितें.

† तुह्मी बोलतां, करितां, इ० तें खरें आहे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

१. तूं आपले पैसे कोठें ठेवितोस ? २. तूं कोठें होतास ? ३. तुह्मांला किती मुलें आहेत ? ४. तो आपलें घर कां विकतो ? ५. तूं तयार असशील काय ? ६. हें बरोबर आहे काय ? ७. तुह्मी सकाळीं केव्हां जेवतां ? ८. माझें (संध्याकाळचें) जेवण तयार नाहीं. ९. तुह्मी कां येत नाहीं ? १०. तुझीं किती हरणें आहेत ? ११. तुझे किती गिन्हाईक आहेत ? १२. तुजजवळ किती तेल आहे ? १३. तूं नाहीं का येणार ? १४. तूं कां बोलत नाहींस ? १५. तो तुझा बाप का ? १६. तूं दिवे कां लावीत नाहींस ? १७. आपल्या गवळ्याच्या किती ह्मैशी आहेत ? १८. तो काय ह्मणतो ? १९. ते तयार केव्हां असतील ? २०. माझ्या मुलाचे कपडे स्वच्छ नाहींत काय ? २१. तुला ही गोष्ट कशी काय आवडते ? २२. तुझे आईबाप कोठें असतात ? २३. माझा डगला कोठें आहे ? २४. त्या वकिलाचें घर कोठें आहे ? २५. ती नाव कोठून येत आहे ?

धडा ९.

चतुर्थी.

४३. नामाच्या पूर्वीं to किंवा for हें अव्यय असलें ह्मणजे नामाची **चतुर्थी** होते. परंतु ज्या व्यक्तीला किंवा ज्या व्यक्तीकरितां सकर्मक क्रियापदावरून एकादी क्रिया करण्यांत येते त्यावरून मात्र ही चतुर्थी होते. एरवीं नामाच्या पूर्वीं to किंवा for असलें तर ती इंग्रेजींत चतुर्थी समजत नाहींत. उदाहरणें—

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

He will show this book *to Râmâ.*
तो रामाला हें पुस्तक दाखवील.
I am doing this *for Râmâ.*
मीं हें रामाकरितां करीत आहें.

४४. Like, unlike आणि near ह्या विशेषणांच्या पुढें **चतुर्थी** येते.

४५. सर्वनामांच्या द्वितीयेच्या रूपांपूर्वीं to किंवा for असलें ह्मणजे त्यांची चतुर्थी होते; जसें—

He will give the money to *me.*
तो ते पैसे मला देईल.

४६. पुढें दिलेल्या क्रियापदांपुढें to हें अव्यय गाळलें तरी चालतें. विशेषेंकरून I, thou, he, she, it, ह्यांच्या पूर्वीं to गाळण्याचा फार संप्रदाय आहे. To चा लोप झाला असला व कर्म जर नाम असलें तर, चतुर्थ्यंत शब्द कर्माच्या पूर्वीं घालावा; जसें—

He was showing the house to *me.*
किंवा
He was showing *me* the house.
तो मला घर दाखवीत होता.

परंतु कर्म जर सर्वनाम असलें तर चतुर्थ्यंत शब्द त्याच्या पुढें घालावा, हें चांगलें; जसें—

He was showing it *me* (किंवा to *me*).
तो मला तें दाखवीत होता.

सांगणें,	to tell.	विचारणें,	to ask.
पाठविणें,	to send.	दाखविणें,	to show.
(उसनें) देणें,	to lend.	(मोकळिक) देणें,	to allow'.
दंड करणें,	to fine.		

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

आणणें,	to bring.
(जाऊन) आणणें, किंमत येणें,	to fetch.
वचन देणें,	to prom'ise.
(किंमत) पडणें,	to cost.
पगार-वेतन देणें,	to pay.
देणें,	to give.
देऊं करणें, पुढें ठेवणें,	to of'fer.
नाकारणें, नाहीं ह्मणणें, रुकार न देणें,	to refuse'.*
ना ह्मणणें, नाकबूल करणें,	to deny.
(हात लांब करून) देणें,	to reach.
(हातानें उचलून) देणें,	to hand.
(अर्ज केला असतां) देणें,	to grant.
सोडणें, सूट देणें,	to forgive'.
क्षमा करणें,	to par'don.
ऋणी-देणें-असणें,	to owe(ओ).
नाखुषीनें देणें,	to grudge.
हेवा करणें,	to en'vy.
करणें, बनावणें,	to make.

४७. शब्दसंग्रह ९.

स्वतंत्रता,	free'dom. lib'erty.
प्रार्थना,	a pra'yer.
उपकार, आभार,	a fa'vour.
उपद्रव, नुकसान,	an in'jury.
कर्तव्यकर्म,	du'ty.
भेट,	a vis'it.
मजुरी, पगार,	wa'ges.†
नारिंग,	an or'ange.
पाप,	sin.
पुण्य,	mer'it.
विनंति,	a request'.
अर्ज,	a peti'tion.
रजा,	leave.

* To refuse हें क्रियापद कोणीं कांहीं मागितलें असतां त्यास नाहीं म्हणण्याकडे लावतात, आणि to deny हें क्रियापद एकादी गोष्ट नाकबूल करण्याकडे लावतात.

† हा शब्द अनेकवचनी असून त्याचा एकवचनी शब्दाप्रमाणें प्रयोग होतो. मोलमजुरीनें वगैरे केलेल्या हलक्या प्रतीच्या कामाबद्दलच्या वेतनाला हा शब्द लावतात. सरकारी नोकर व कामगार ह्यांच्या वेतनाला pay किंवा salary ह्मणतात. व वैद्यकी, वकिली, इत्यादि उंच प्रतीच्या धंद्यांच्या लोकांना जें द्रव्य द्यावें लागतें त्यास fee ह्मणतात. तसेंच शाळांत मुलांस शिकविण्याबद्दल जो पैका भरावा लागतो त्यासही fee ह्मणतात.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

गुन्हेगार, अपराधी,	an offend'er.	कोणीही, कांहींही, कोणता-ती-तें-ही,	an'y.
रक्कम,	a sum.	गुन्हा, अपराध,	an offence'.
प्रश्न,	a ques'tion.	गुलाम, दास,	a slave.
उत्तर,	an an'swer.*	सर्व,	all.
बंदर,	an har'bour.		

भाषांतरपाठ ९.

४८.—१. मी आपला अर्ज तुह्यांला दाखवीन. २. आपण तें पुस्तक मला द्याल काय? ३. तेवढें पुस्तक मला आणून देतोस काय? ४. ह्या सुया तिला देशील का? ५. तूं आपला चाकू अंमळ† मला देतोस का? ६. एका खुर्चीला काय किंमत पडते? ७. चार खुर्च्यांला मला काय किंमत पडेल? ८. ह्या घोड्याची काय किंमत येईल? ९. मी त्याला दहा नारिंगें पाठवीन. १०. मी चाकरांला त्यांचा पगार देईन. ११. मी त्याला उत्तर देईन. १२. तो तुला काय उत्तर देतो? १३. मी तिला कांहीं प्रश्न विचारीत होतों. १४. तो तुला पांच रुपये‡ (पगार) देईल. १५. मी तुझें कांहीं लागतों काय? § १६. तूं माझे सात रुपये लागतोस.|| १७. मी हें पत्रं कोणास देऊं? १८. मी कोणाचे आभार मानूं? १९. पत्र त्याला केव्हां पोहोंचेल? २०. हें गलबत त्या देशाला केव्हां पोहोंचेल? २१. तूं पुण्याला¶ केव्हां पोहोंचशील? २२. तेवढी लेखणी मला (हात लांब करून)

---

* ह्या शब्दांतील *w* चा उच्चार होत नाहीं.

† For a moment. ‡ रुपया=a rupee.

§ Do I owe you anything?

|| You owe me seven rupees.

¶ पुणें=Poona.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

देतोस का ? २३. मला रजा देतां का ? २४. तो मला क्षमा करणार नाहीं. २५. मी त्या गुन्हेगाराला क्षमा करणार नाहीं. २६. मला लहानशी रक्कम उसनी देतां का ? २७. तें मला सांगशील काय ? २८. तें तिला देशील काय ? २९. तो तुला पांच रुपये देऊं करील. ३०. तो मला दुधाचा प्याला देत आहे.* ३१. ह्या टोपीला तुला काय पडलें ?

१. The ship will reach the harbour. २. Will you reach *me* that orange? ३. I pardon *thee* this offence. ४. Will you not pardon *me?* ५. Who will pardon my sins? ६. Who will tell *us* our duty? ७. God will forgive *us* our sins. ८. God will forgive *you.* ९. They do not forgive an injury. १०. Thou wilt grant *me* life and favour. ११. I shall grant *him* his request. १२. He grants it *to me.* १३. Your master will grant *you* leave. १४. Why do you grudge *them* their wages? १५. What will thy wages be? १६. The wages of sin is death. १७. The master will allow *the slave* his liberty. १८. We allow *him* a small sum of money. १९. Will you not promise *your friend* a visit? २०. He will not deny *you* anything. २१. He denies *us* bread. २२. Do you envy *me* my riches? २३. Will you fetch *me* my umbrella? २४. What will this table fetch? २५. The judge will fine *her* a large sum of money. २६. Your father will not refuse *you* the small sum of four rupees. २७. Shall I ask *you* a question? २८. *To which* of those boys shall I give these oranges? २९. *To whom* will you tell this news? ३०. What will this cradle cost?

---

* To offer.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

धडा १०.

स्वतां.

४९. I, thou, he, she, it, ह्यांच्या कांहीं विभक्तिरूपांला self हा शब्द जोडला ह्मणजे, त्यांचा **स्वतां** असा अर्थ होतो; जसें—

I myself,	मी स्वतां.	we ourselves,	आह्मी स्वत.
thou thyself, you yourself,	तूं स्वतां.	you yourselves,	तुह्मी स्वतां.
he himself,	तो स्वतां.	they themselves,	ते, त्या, तीं स्वतां.
she herself,	ती स्वतां.		
it itself,	तें स्वतां.		

उदाहरण–He *himself* will write, **तो स्वतां लिहील.**

५०. हे शब्द कर्त्यापासून वेगळे करून वाक्याच्या शेवटीं घालण्याचा बराच संप्रदाय आहे; जसें—

I do not like it *myself.*

मला स्वतांला तें आवडत नाहीं.

५१. कर्माच्या स्थानीं हे शब्द घातले तर, त्यांचा अर्थ **स्वतांला** असा होतो; जसें—

He is hurting *himself.*

तो स्वतांला दुखापत करीत आहे.

५२. **स्वतांचा-ची-चें** ह्याबद्दल own हें विशेषण घालतात. तें I, thou, he, she, it, ह्यांच्या षष्ठीच्या पुढें येतें; जसें—

This is my *own* book.

हें माझें स्वतांचें पुस्तक आहे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

५३. शब्दसंग्रह १०.

सभ्य गृहस्थ,	a gen'tleman.	दया,	mer'cy.
कुलीन स्त्री,	a la'dy.	पाहुणा,	a guest.
तसवीर,	a pic'ture.*	परका-की, तिऱ्हाईत,	a stran'ger.
(पैशाची) पिशवी, कसा,	a purse.	सधन करणें,	to enrich'.
शाई टिपण्या-चा कागद,	blot'ting-paper.	पोषाख करणें,	to dress.
		वजन करणें,	to weigh.
जखम,	a wound.	वजन,	weight.
जखम करणें,	to wound.	शिकविणें,	to teach.

भाषांतरपाठ १०.

५४.—१. He will not hide *himself*. २. The girl was amusing *herself*. ३. How will you amuse *yourselves*? ४. The gentlemen will amuse *themselves*. ५. Who will praise *himself*? ६. I believe it *myself*. ७. You are frightening *yourself*. ८. Who will recommend *himself*? ९. The child is hurting *itself*. १०. She was doing it *herself*. ११. You do not believe it *yourself*. १२. You do not believe it *yourselelves*. १३. My husband and *myself* were reading. १४. You *yourself* will reward him. १५. Will you dress *yourself*? १६. I was dressing his wound.† १७. You do not see your *own* faults. १८. Is that his *own* purse? १९. You have got my book; where is your *own*? २०. God is mercy *itself*.‡

१. तो स्वतां येणार नाहीं. २. ती स्वतां गात होती. ३. ती कुलीन स्त्री आपल्या मुलींला शिकवीत होती. ४. तो

---

* शब्दाच्या शेवटल्या *ture* ह्याचा चर् असा उच्चार होतो.

† To dress a wound=जखम धुणें-बांधणें, मलमपट्टी बांधणें.

‡ मूर्तिमंत, साक्षात्.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

स्वतां ती पेटी वजन करीत होता. ५. तो स्वतां आपली जखम धूत होता. ६. तूं पोषाख कां करीत नाहीं? ७. ह्या पत्राचें वजन तूं कसें काढशील?* ८. मी हें काम स्वतां करीत नसतों. ९. तो स्वतां तुला विचारील. १०. तो स्वतां मला कांहीं तसबिरी दाखवीत होता. ११. तो तुला काय शिकवीत असतो?† १२. ह्या कोणाच्या तसबिरी आहेत? १३. त्या माझ्या नाहींत. १४. ही तुझी स्वतांची पिशवी आहे काय? १५. दऊत तुझी स्वतांची आहे काय? १६. ती अंमळ मला देतोस काय? १७. हा टिपण्याचा कागद कोणाचा? १८. ही गाडी कोणाची? १९. ह्या घराचा मालक कोण? २०. तें आमचें स्वतांचें घर आहे. २१. तो स्वतांला जखमी करीत आहे. २२. हाच का तुझा पाहुणा? २३. तो परका मनुष्य आहे. २४. तूं स्वतांला सधन करीत आहेस. २५. आपण स्वतांवर प्रीति करतों. २६. तूं स्वतां जाशील काय? २७. मी स्वतां तुला पत्र लिहीन. २८. तुला काय पाहिजे? २९. असा सद्गुणी पुरुष आपणांला कोठें सांपडेल? ३०. असला धंदा तुला कसा आवडतो?

धडा ११.

विशेषणाचा तारतम्यभाव.

५५. "महाराष्ट्रभाषेंत विशेषणाचा तारतम्यभाव असतां इतर भाषांप्रमाणें विशेषणास कांहीं विशेष होत नाहीं; ह्मणजे अमुक अमक्या गुणानें दुसऱ्यापेक्षां अथवा सर्वांपेक्षां अधिक

---

* To find. † To teach हें द्विकर्मक क्रियापद आहे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

असा अर्थ असतां विशेषणास कांहीं विशेष कार्य होत नाहीं.*" परंतु इंग्रेजींत तसा अर्थ असतां विशेषणास कांहीं कार्य होत असतें. तें कांहीं संख्याविशेषणें खेरीज करून गुणविशेषणांस मात्र होतें. दोहोंपैकीं एका व्यक्तीचें गुणाधिक्य दाखविण्याचा जो प्रकार त्यास comparative degree असें ह्मणतात, व दोहोंपेक्षां अधिक व्यक्ती पैकीं एका व्यक्तीचें गुणाधिक्य दाखविण्याच्या प्रकाराला superlative degree असें ह्मणतात.

५६. एकावयवी, व ज्यांच्या शेवटीं स्वर आहे अशा कांहीं दोन अवयवांच्या, विशेषणांला er व est हे प्रत्यय लावले ह्मणजे comparative व superlative degree होतात; जसें—

Great,	greater,	greatest.
मोठा,	हून-पेक्षां **मोठा,**	(सर्वांहून) **मोठा.**

५७. Er व est हे प्रत्यय लावतांना पहिल्या भागांतील पृ० २२, कलमें ६,८ व ९ ह्यांत सांगितलेले नियम लागतात; जसें—

Hot,	उष्ण,	hot*t*er,	hot*t*est.
Happy,	सुखी,	happ*i*er,	happ*i*est.
Wise,	शाहाणा,	wis*e*r,	wis*e*st.

५८. दोन व्यक्तींची तुलना करतांना त्या सारख्या विभक्तींत घालाव्या व त्यांच्यामध्यें than (**पेक्षां**) हें उभयान्वयी अव्यय घालावें; जसें—

He is wiser than *I*.
तो मजपेक्षां शाहाणा आहे.

---

* दादोक्त महाराष्ट्र व्याकरण 'विशेषणविचार.'

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

You love *him* more than *me*.

तूं माझ्यापेक्षां त्याच्यावर अधिक प्रीति करतोस.

He is kinder to *you* than to *me*.

त्याची माझ्यापेक्षां तुझ्यावर अधिक कृपा आहे.

पेक्षां हें मराठींत शब्दयोगी अव्यय आहे; परंतु than हें इंग्रेजींत उभयान्वयी अव्यय आहे. जसें—पहिल्या वाक्यांत than ह्या शब्दानें He is wiser आणि I am ह्या दोन वाक्यांचा अन्वय केला आहे.

५९. *Est* हा प्रत्यय लावला ह्मणजे विशेषणाच्या पूर्वीं the हें उपपद व पुढें षष्ठी येते. ह्या षष्ठीचा अर्थ **पैकीं-मध्यें-हून** असा असतो; जसें—

Socrates was *the* wisest *of* the Athenians.

साक्रेटिस हा अथीनिअन लोकांमध्यें सर्वांहून शाहाणा होता.

६०. Than ह्या शब्दानें जोडलेलीं जीं दोन वाक्यें त्यांपैकीं पहिल्या वाक्यांतला एकादा शब्द दुसऱ्या वाक्यांत पुनः येत असला तर एकवचन किंवा अनेकवचन असेल त्याप्रमाणें त्याच्याबद्दल that किंवा those हा शब्द घालावा. क्रियापद असलें तर त्याच्या बद्दल do हें क्रियापद घालावें किंवा अध्याहार करावा; जसें—

Your coat is bigger than *that* of your brother.

तुझ्या भावाच्या अंगरख्यापेक्षां तुझा अंगरखा मोठा आहे.

He knows more than you (*do*).

तुझ्यापेक्षां तो अधिक जाणतो.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

६१. शब्दसंग्रह ११.

थोर, भव्य,	no'ble.	हिरा,	a di'amond.
सोपा-पी-पें,	ea'sy (ईजि).	माणिक, लाल,	a ru'by.
शांत, सौम्य,	mild.	रत्न,	a jew'el.
वेगळा, निराळा,	dif'ferent.	मोतीं,	a pearl.
बहुमोलाचा,	pre'cious.	पाच,	an em'erald.
परिमाण, आकार,	size.	इंद्रनीलमणी, नील,	a sap'phire.
पाऊस,	rain.	पृथ्वी,	the earth.
वर्ग,	a class.	जग,	the world.
शाळा,	a school.	झुडुप,	a shrub.
सुंदर, रमणीय,	love'ly.	वनस्पति,	a herb.*
किरण,	a ray.	व्यापारी,	a mer'chant.

भाषांतरपाठ ११.

६२.—१. कांहीं जनावरें कांहीं मनुष्यांपेक्षां शाहाणीं असतात. २. सर्व वस्तूंपेक्षां हिरा कठीण असतो. ३. पाच हिरवी असते. ४. हा मनुष्य माझ्यापेक्षां गरीब आहे. ५. तुमच्या आरशापेक्षां आमचा आरसा जाड आहे. ६. तुझ्या बापापेक्षां तुझा चुलता श्रीमंत आहे. ७. कांहीं बायका पुरुषांपेक्षां धीट असतात. ८. तूं अशक्त आहेस व तुझी बहीण तुझ्याहून अशक्त आहे. ९. त्या विहिरीपेक्षां ही विहीर खोल नाहीं काय? १०. तो मुलगा सर्वांहून उंच आहे. ११. त्याच्यापेक्षां तूं उंच आहेस काय? १२. पुष्कळ मुलांचे स्वच्छ हात नसतात. १३. त्या सर्व चाकूंपेक्षां हा चाकू तीक्ष्ण होता. १४. तांब्यापेक्षां सोनें महाग

---

* ज्याचें मूळ दर वर्षास सुकून मरतें असें झाड. कित्येक प्रकारचा भाजीपाला व सर्व प्रकारचें गवत ह्याला हा शब्द लावतात.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

असतें. १५. सोन्यापेक्षां लोखंड कठीण असतें. १६. पृथ्वीपेक्षां सूर्य मोठा आहे. १७. त्या मुलीपेक्षां तुमची मुलगी शाहाणी आहे. १८. त्या मुलाचा अंगरखा माझ्या अंगरख्यापेक्षां लहान आहे. १९. ह्या लठ्ठ मनुष्याचा अंगरखा सर्वांत मोठा आहे.

१. Râmâ is tall*er* than Govindâ. २. Hari is the tall*est* of the three. ३. The leaves of this tree are not larg*er* than those of that shrub. ४. Oil is light*er* than water. ५. Mercury is heav*ier* than water. ६. You will get a reward. ७. His clothes are clean*er* than yours. ८. The sun is bright*er* than the moon. ९. The rays of the moon are mild*er* than those of the sun. १०. These lessons are eas*ier* than those. ११. The ruby is a precious Stone* of a red colour. १२. Pearls are of different sizes. १३. Some merchants are rich*er* than princes. १४. The inhabitants of Europe are brav*er* than those of Asia. १५. Who is the strong*er* of the two? १६. You are bold*er* than you were. १७. Some poor men are happ*ier* than kings. १८. Rain water is pur*er* than the water of lakes and rivers. १९. Silver is chea*per* than gold. २०. Your stick is shorter than Râmâ's. २१. My uncle's dog is big*ger* than mine.

धडा १२.

विशेषणाचा तारतम्यभाव (पुढें चालू).

६३. ज्यांचे दोन किंवा अधिक अवयव असतात, अशा

---

* A precious stone=जवाहीर.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

विशेषणांचा **तारतम्यभाव** दाखवावयाचा असल्यास पूर्वीं more* **अधिक** व most **अतिशय** हे शब्द घालावे; जसें—

Generous, *more* generous, *most* generous.

उदार, हून-पेक्षां उदार, सर्वांहून-पेक्षां उदार.

६४. कित्येक विशेषणांचीं तारतम्यभावदर्शक रूपें नियमाप्रमाणें होत नाहींत; जसें—

Good,	चांगला-ली-लें,	bet'ter,	best.
Bad,	वाईट,	worse,	worst.
Lit'tle,	थोडें,	less,	least.
Much,†	पुष्कळ,	more,	most.
Many,	पुष्कळ,	more,	most.
Old,	म्हातारा,	old'er, eld'er,	old'est. eld'est.

६५. Older व oldest हीं रूपें कोणत्याही प्राण्यास किंवा पदार्थास लावतां येतात. Elder ह्याचा अर्थ **वडील** व eldest ह्याचा **सर्वांहून वडील** असा होतो.‡ Old हा शब्द वय सांगण्याकडे लावतात; जसें—

The child is three years *old*.

मूल तीन वर्षांचें आहे.

---

* तारतम्यभाव दाखविणाऱ्या more व most ह्या शब्दांचें भाषांतर करतांना हून किंवा पेक्षां घालून होईल तितका निर्वाह करावा व अधिक व अतिशय हे शब्द फारसे घालूं नयेत, कारण ते मराठीच्या रचनेला शोभत नाहींत. परंतु एरवीं अधिक व अतिशय हे शब्द घालावे.

†Many हें विशेषण संख्या दाखवितें व much हें परिमाण दाखवितें; जसें—*many* men पुष्कळ लोक, *much* sugar पुष्कळ साखर.

‡ Elder व eldest हे शब्द विशेषणात्मक आहेत म्हणून त्यांच्या पुढें नाम असलें पाहिजे. त्यांच्या पुढें than हें उभयान्वयी अव्यय येऊं शकत नाहीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

How *old* are you?

तुझें वय काय?

किंवा **तुझी उमर किती वर्षांची आहे?**

ह्याप्रमाणें older ह्याचा अर्थ **वयानें अधिक** किंवा **मोठा** असा होतो; जसें—

I am *older* than you.

मी तुझ्यापेक्षां (वयानें) मोठा आहें.

६६. शब्दसंग्रह १२.

मेहनती, तत्पर,	dil'igent.	अज्ञानी,	ig'norant.
पथ्यकर, हितकारी,	whole'some.	इष्ट,	desir'able.
उल्हासी, रंगेला,	gay.	विद्वान्,	learn'ed.
मोलवान्, उपयोगी,	val'uable.	अवघड,	dif'ficult.
बहुमोलाचा-ची-चें,	cost'ly.	पिण्याचा पदार्थ,	a drink.
आदरशील,	polite'.	खुशामत करणें,	to flat'ter.
मैत्री,	friend'ship.	आर्जवी, खुशामत्या,	a flatterer.
शहाणपण,	wis'dom.	बाल्यावस्था,	child'hood.
ज्ञान,	know'ledge.	तारुण्य,	youth.
अज्ञान,	ig'norance.	वय,	age.
वागणूक, वर्तणूक,	con'duct.	म्हातारपण,	old age.

भाषांतरपाठ १२.

६७.—१. These children are *more* attentive and diligent than those. २. This boy is the *most* diligent of all. ३. Some poor men are *more* honest than some rich men. ४. Are the richest persons the *most* honest? ५. Water is the *most* wholesome drink. ६. Will you give me a glass of water? ७. He is the gayest of the gay. ८. Good books are *more* valuable than fine clothes. ९. Is not milk *more*

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

wholesome than wine? १०. This is the most useful of all those books. ११. He is *more* polite than his wife. १२. Friends are *better* than flatterers. १३. The *oldest* friends are the *best*. १४. My *eldest* brother is the *oldest* of those officers. १५. What is your *elder* brother doing? १६. This farmer has much corn. १७. His conduct is *worse* than that of his younger brother. १८. This book is *more* costly than yours. १९. Iron is the *most* useful of the metals. २०. The Greeks were *more* learned than the Romans. २१. What is *more* desirable than virtue?

१. तुझ्या भावाचें वय काय? २. गोविंदापेक्षां रामा (वयानें) मोठा आहे. ३. तुझी वडील बहीण कोठें आहे? ४. त्या झुडपापेक्षां हें झाड जुनाट आहे. ५. हें घर सर्वांहून जुनाट आहे. ६. हें मूल एक वर्षाचें आहे. ७. तुमचे वडील* काय करीत आहेत? ८. त्या चौघां भावांपैकीं सर्वांत वडील भाऊ कोठें राहतो? ९. त्यांचीं पुष्कळ घरें आहेत. १०. मला अधिक भात पाहिजे. ११. ही स्त्री फार उद्योगी आहे. १२. ह्या गांवापेक्षां तें खेडें चांगलें आहे. १३. बायकांपेक्षां पुरुष बळकट असतात. १४. सोन्यापेक्षां लोखंड अधिक उपयोगी आहे. १५. तें काम अधिक अवघड आहे. १६. शहाणपणापेक्षां अधिक चांगलें काय आहे? १७. ज्ञानापेक्षां अधिक इष्ट काय आहे? १८. पृथ्वीपेक्षां चंद्र लहान आहे. १९. सर्व श्रीमंत लोक विद्वान् असतात काय? २०. तूं त्याची खुशामत कां करितोस?

---

* Father.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

धडा १३.

क्रियाविशेषणें.

६८. पुष्कळ क्रियाविशेषणें, विशेषणांला *ly* हा प्रत्यय लागून झालेलीं असतात; जसें —

wise*ly*, **शाहाणपणानें.**

६९. True **खरा** ह्यापासून tru*ly* **खरोखर** व due **योग्य** ह्यापासून du*ly* **वाजवी रीतीनें** अशीं क्रियाविशेषणें होतात.

७०. क्रियाविशेषणें, बहुतकरून ज्या क्रियापदांशीं त्यांचा संबंध असतो, त्यांच्या पुढें येतात; जसें—

He reads *slowly*.

तो हळू वाचतो.

प्रश्नार्थक क्रियाविशेषणें व not ह्यांच्या विषयीं पूर्वींच सांगितलें आहें.

७१. क्रियापद सकर्मक असलें तर, क्रियाविशेषण कर्माच्या पुढें घालावें; जसें—

He reads the book *slowly*.

तो तें पुस्तक हळू वाचतो.

७२. अनेक क्रियाविशेषणांचा एकाच क्रियेशीं संबंध असला तर प्रथम **स्थळवाचक**, नंतर **रीतिवाचक**, व त्यांच्या पुढें **कालवाचक**, असा क्रम ठेवावा; जसें—

He was standing *here quietly yesterday*.

तो येथें काल निमुटपणें उभा होता.

हा नियम नेहमीं पाळतात असें नाहीं.

७३. क्रियाविशेषणाचा विशेषणाशीं किंवा दुसऱ्या क्रियाविशेषणाशीं संबंध असला तर तें त्याच्या पूर्वीं घालावें; जसें—

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

Very good, फार चांगलें.
Very wisely, मोठ्या शाहाणपणानें.

७४. निश्चयार्थक, पर्यायवाचक, व कांहीं कालवाचक क्रियाविशेषणें बहुतकरून मुख्य क्रियापदाच्या पूर्वीं येतात ; जसें—

He will *certainly* come.
तो खचीत येईल.

अशा प्रकारचीं कांहीं क्रियाविशेषणें खालीं दिलीं आहेत.

निश्चयार्थक.		पर्यायवाचक.	
खचीत,	cer'tainly. / sure'ly.	मुख्यत्वेंकरून,	chief'ly. / espe'cially. / prin'cipally.
निःसंशय,	doubt'less. / undoubt'edly.	अतिशय, पुष्कळ,	exceed'ingly
		अगदीं,	quite.
बहुतकरून, प्रायः,	al'most. / near'ly.	केवळ, मात्र, फक्त,	mere'ly. / sim'ply.
खरोखर,	re'ally. / indeed.	विरळा, क्वचित्,	scarce'ly. / hard'ly.
		फार,	very.*

कालवाचक.

वारंवार, अनेक प्रसंगीं,	often.	क्वचित्,	sel'dom. / rare'ly. / scarce'ly, ev'er.
नेहमीं,	al'ways.		
कधीं न,	nev'er.	सामान्यतः, बहुधा,	gen'erally.
कधींतरी, नेहमीं,	ev'er.	बहुधा, बहुतकरून,	u'sually.

* ह्याचा नेहमीं विशेषणाशीं संबंध असतो.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

७५. Enough* बरा-री-रेंच हें क्रियाविशेषण, ज्या विशेषणाशीं त्याचा संबंध असतो, त्याच्या पुढें असतें; व तें विशेषणही बहुधा नामाच्या पुढें असतें; जसें—

This house is large *enough*.

हें घर बरेंच मोठें आहे.

७६. शब्दसंग्रह १३.

येथें, इकडे,	here.	पुढें,	for'ward.
तेथें, तिकडे,	there.	वर,	up.
आतां,	now.	खालीं,	down.
इतक्यांत,	just now.	जलद,	fast.
तेव्हां,	then.	घाईनें,	hur'riedly.
आंत,	in.	पुनः,	again.
काल,	yest'erday.	एकत्र,	to-gether.
आज,	to-day.	पुण्यशील, नीतिमान्,	right'eous. (राइचस्).
उद्यां,	to-mor'row.	आश्चर्यकारक,	wond'erful.
कधीं कधीं,	some'times.	सगळा-ळी-ळें,	whole(होल).
अशा रीतीनें, इतका,	so.†	चूक,	a mis'take.
दरतासास,	hourly.‡	दररोज,	daily. §
बाहेर,	out.	दरमहिन्यास,	month'ly.§
पूर्वीं,	before'.	दरवर्षास,	year'ly.§
मागें, परत,	back.	वेळच्या वेळीं,	punc'tually.

* हा शब्द कधीं नाम आणि कधीं विशेषणही असतो.

† हें कधीं दर्शक सर्वनामही असतें; भाग १, पृ० ४८, क० ७५, पहा.

‡ हा शब्द विशेषणही असतो. तेव्हां त्याचा अर्थ दरतासाचा असा होतो.

§ हे तीन शब्द विशेषणही असतात. तेव्हां त्यांचा अर्थ रोजचा, दरमहिन्याचा, इ० होतो.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

वाईट (रीतीनें),	bad'ly.	वेडेपणा, वेड,	mad'ness.
कठोरपणानें,	severe'ly.	राग,	an'ger.
लागला-ली-लेंच,	imme'diately.	अधाशीपणानें खाणें,	to devour'.
शत्रु, वैरी,	a foe.	परत येणें-करणें,	to return'.
लहर,	a fit.	काळजीनें, जपून,	care'fully.
हाल, कष्ट,	mis'ery.	स्वप्न,	a dream.

भाषांतरपाठ १३.

७७.—१. तूं जलद चालतोस. २. तो फार उंच आहे. ३. मी येथें आहें. ४. मी तेथें स्वतां जाईन. ५. तो खचीत परत येईल. ६. तो तुला तुझे पैसे निःसंशय परत देणार नाहीं. ७. खरोखर ही फार आश्चर्यकारक गोष्ट आहे. ८. खरोखर हें कांहीं मोठें अवघड काम नाहीं. ९. तो तुझ्यापेक्षां मोठा आहे. १०. तें मोतीं फार लहान आहे. ११. मी फक्त आपला चाकू घेत होतों. १२. तो कधीं तरी खोटें बोलेल काय? १३. तूं येथें कधींही असणार नाहींस. १४. मी पुनः कधीं असें करणार नाहीं. १५. तो मला असें सांगतो. १६. तो असें म्हणतो. १७. तिला असें वाटतें. १८. रामा विद्वान् आहे; तसाच गोविंदा आहे. १९. तें फळ इतकें गोड आहे काय? २०. तो इतका शहाणा आहे. २१. तूं नेहमीं असेंच ह्मणतोस. २२. मला खरोखर ही गोष्ट ठाऊक नाहीं. २३. त्याचा वडील भाऊ नेहमीं येथें येत असतो. २४. तो नेहमीं मला त्या तसबिरी दाखवितो. २५. तुझा मित्र मला वारंवार तेथें बोलावित असतो. २६. आह्मीं कधीं चहा पितों व कधीं दूध पितों. २७. तो आंत आहे. २८. ते पुढें जातात,

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Pund

२९. मी तुला दररोज तेथें पहातों. ३०. त्याचा महिन्याचा पगार काय आहे? ३१. मी उद्यां खचीत जाईन. ३२. तो मोठा कावेबाज आहे. ३३. ती फार हळू चालते. ३४. मी येथें वेळच्या वेळीं येतों. ३५. तेथें किती बायका होत्या?

१. The good boy reads the whole lesson *carefully.* २. *Where* shall I go? ३. He will *not* swim. ४. You write *very badly.* ५. The master was punishing the disobedient boy *severely.* ६. We were going *there hurriedly yesterday* ७. Will you come *here to-morrow?* ८. I shall bring him *here immediately.* ९. He is sitting *there impatiently.* १०. *Certainly* this was a righteous man. ११. Your father will *undoubtedly* punish you. १२. *Indeed* this is a *very* bad thing. १३. The gentleman will *surely* come. १४. The dishonest man will *really* not pay you anything. १५. The anger of the people is *really* a short fit of madness. १६. I *almost* hate him. १७. I was *merely* taking my blotting-paper. १८. You were *nearly* making a mistake. १९. He is *quite* right. २०. The hungry man is devouring his food. २१. I *rarely* see you and John *together.* २२. He is a foe to virtue. २३. Misery is *often* the fruit of vice. २४. Wisdom and youth *seldom* go* *together.*

धडा १४.

क्रियाविशेषणाचा तारतम्यभाव.

७८. विशेषणांला *ly* हा प्रत्यय लावून झालेल्या क्रियाविशेषणांपैकीं बहुतेकांचा तारतम्यभाव विशेषणाप्रमाणें more व most ह्या शब्दांवरून कळतो; जसें—

* Go = असणें, राहणें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

Wisely, *more* wisely, *most* wisely.

७९. कांहीं क्रियाविशेषणांला *er* व *est* हे प्रत्यय लागतात; जसें—

Soon,	लवकर,	soon'*er*,	soon'*est*.
Oft'en,	वारंवार,	oft'en*er*,	oft'en*est*.
Near,*	जवळ,	near'*er*,	near'*est* किंवा next.

८०. कांहींचीं रूपें नियमाप्रमाणें होत नाहींत; जसें—

Well,	बरें,	better,	best.
Ill, Badly,	वाईट,	worse,	worst.
Little,	अंमळसा, जरासा,	less,	least.
Much,	पुष्कळ,	more,	most.
Far,	दूर,	far'ther,	far'thest.
Forth,	पुढें,	fur'ther,	fur'thest.

८१. शब्दसंग्रह १४.

खुशीनें,	will'ingly.	शब्द,	a word.
स्पष्टपणें,	distinct'ly.	वाक्य,	a sen'tence.
शुद्ध रीतीनें,	correct'ly.	चाल,	a cus'tom.
मूर्खपणानें,	fool'ishly.	भूषण, डागिणा,	an or'nament.
तत्परतेनें,	diligent'ly.	आकस्मिक गोष्ट, अवचट,	an ac'cident.
पूर्णपणें,	perfect'ly.		
फार, बहुत,	great'ly.	वारंवार,	fre'quently.
नाखुशीनें,	unwill'ingly.	सतत,	con'stantly.
शांतवृत्तीनें, हळू,	gent'ly.	ख्यालीखुशालीनें, मौजेनें,	mer'rily.

* Near हें विशेषणही असतें. त्याच्या पुढें चतुर्थी येते व त्या चतुर्थीच्या to चा लोप होतो; जसें—My friend sits *near me* माझा मित्र माझ्या जवळ बसतो. Like सारखा आणि unlike निराळा ह्या विशेषणांच्या पुढल्या चतुर्थीचा असाच प्रकार होतो. Maetzner's *English Grammar*, भाग २, पृ० २११, पहा.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Pun

मधुरपणें,	sweet'ly.	समाधान-तृप्त करणें,	to sat'isfy.
वाजवी रीतीनें, ठीक,	just'ly.	समजणें,	to understand'
अकस्मात,	sud'denly.	भिवविणें, घाबरवणें,	to alarm'.
कडकडीत रीतीनें, अगदीं,	strict'ly.	रानटी,	bar'barous.
उच्चार करणें,	to pronounce'.	भाडें,	rent.

भाषांतरपाठ १४.

८२.—१. We pay our rent monthly. २. I often write a letter to my cousin. ३. I seldom get an answer. ४. The lion's greatest ornament is his beautiful mane. ५. The birds are singing merrily. ६. We never had such an accident before. ७. This accident will greatly alarm his friends. ८. Most* people like horses. ९. What is like thee? १०. This accident is not unlike my dream. ११. This story is not unlike yours. १२. The house stands† near the river. १३. Will you come near*er*? १४. I now see him *more* frequently than before. १५. You write *more* correctly than *most* boys of your class. १६. You learn your lessons well. १७. John learns them *better*. १८. Which animal do you like *best*? १९. Will you pronounce that word again *more* distinctly? २०. I will perfectly satisfy you. २१. You hardly understand the sentence. २२. They have many barbarous customs. २३. His daughter sings beautifully. २४. I will learn *more* diligently. २५. My parents will *most* willingly grant my request.

१. आह्मी तुला खुशीनें मदत करूं. २. रोटीवाला उद्यां अधिक लवकर येईल. ३. हरिण अधिक दूर जात होता.

---

* Most ह्या विशेषणापूर्वी the ह्या उपपदाची गरज नसते. † आहे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

४. तो वाईट वाचतो व अधिक वाईट लिहितो. ५. सर्वांहून लवकर कोण येईल? ६. आह्मी बहुधा दररोज दोन धडे शिकतों. ७. कोणता मुलगा आपला धडा उत्कृष्ट रीतीनें तयार करतो? ८. कारकून तें पत्र अतिशय काळजीनें लिहित होता. ९. तूं नेहमीं कामांत असतोस. १०. आमचा गंवडी हें काम अधिक लवकर करील. ११. तूं वाईट लिहितोस. १२. तो मला हा प्रश्न वारंवार विचारीत असतो. १३. कांहीं माणसें थोडें बोलतात व अधिक करतात. १४. तूं विचार फार करतोस. १५. हीं फळें फार रुचकर आहेत. १६. तुमचा मुलगा शुद्ध रीतीनें लिहितो. १७. तो नेहमीं खरें बोलतो. १८. तूं त्याचें समाधान कसें करशील? १९. तुला तो कधीं भेटतो काय? २०. तो इतक्यांत तेथें होता.

धडा १५.

आज्ञार्थ.

८३. नुसत्या क्रियापदावरून उभयवचनीं आज्ञार्थाचा अर्थ होतो;* जसें—write **लिही** किंवा **लिहा**.

---

*सर्वनामावर विशेष जोर असला तर त्याचा अध्याहार न करतां तें जोरानें उच्चारावें; जसें—

You write,	तूंच लिही.
किंवा Do *You* write,	तूं तरी लिही.
Do not *You* write,	तूं लिहूं नको.

आज्ञार्थाचा दुसरा एक प्रकार आहे, त्याचाही प्रयोग प्रचारांत पुष्कळ आढळतो.—

Let us write, आपण लिहूं या.
Let him (her, it,) write, त्याला लिहूं दे (किंवा) द्या.
Let them write, त्यांला लिहूं दे (किंवा) द्या.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Pun

येथें द्वितीय पुरुषाचा अध्याहार आहे असें समजावें.

☞ आज्ञा निकडीची असल्यास do हें सहाय क्रियापद योजून तें जोरानें उच्चारावें; जसें—

Do write, { **लिही लिही**; किंवा **लिहा लिहा.**
लिही तर खरा; किंवा **लिहा तर खरे.**

८४. अकरणरूपीं Do not write **लिहूं नको** असा प्रयोग होतो; परंतु हें लक्षांत ठेवावें कीं अकरणरूपांत do हें केवळ सहाय क्रियापद आहे व तें करणरूपाप्रमाणें निकड किंवा जरूरी दाखवीत नाहीं.*

८५. To be व to have ह्याचीं आज्ञार्थाचीं रूपें be व have अशीं होतात.

☞ आज्ञार्थाचीं दुसरीं कांहीं रूपें आहेत, तीं प्रथमपुरुषीं बहुवचनीं व तृतीयपुरुषीं एकवचनीं व बहुवचनीं लागतात; जसें-

Let us write, **आपण लिहूं या.**
Let him (her, it) write, **त्यांला लिहूं दे.**
Let them write, **त्याला लिहूं दे.**

८६. पूर्वीं सांगितलेंच आहे कीं प्रश्नरूपी वाक्याचा कधीं कधीं विनंति करण्याकरितां किंवा कोणास कांहीं काम करावयास सभ्य रीतीनें सांगण्याकरितां, आज्ञार्थाप्रमाणें उपयोग करतात; जसें—

---

* आज्ञार्थी करणरूपांत do हें सहाय्य क्रियापद जसें निकड किंवा जरूरी दाखवितें, त्याचप्रमाणें वर्तमान व भूतकाळीं क्रियेवर जोर देण्याकरितां तें योजतात; जसें—I *do* write मी लिहितोंच, मी लिहीत नाहीं तर काय. I *did* write मीं खचीत लिहिलें; परंतु प्रश्नरूपी व सर्व प्रकारच्या अकरणरूपी वाक्यांत do चा कांहींच अर्थ होत नाहीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

Will you read? **वाचतोस का? वाच बघूं.**

८७. आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या मनुष्यास हुकूम करतांना देखील, शब्दाचा कठोरपणा काढून टाकण्याकरितां आज्ञार्थी व त्याच अर्थाच्या प्रश्नरूपी वाक्यांत, please किंवा if you please हे शब्द घालण्याची सभ्य भाषणांत फार चाल आहे;* जसें—

Please hand me that pen-knife.

तेवढा चाकू उचलून दे बघूं.

Bring me some water, if you please.

मला थोडेंसें पाणी आणून दे बघूं.

Will you, please, give me that book?

कृपा करून तेवढें पुस्तक देतां का?

८८. शब्दसंग्रह १५.

विचार,	thought. / a thought.	संगत,	the com'pany.
		साधुसमागम,	good com'pany.
मुद्रा, रूप,	an appear'ance.	ठकविणें,	to defraud'.
उटणें,	an oint'ment.	भाषांतर करणें,	to trans'late.
स्वदेशाभिमान,	pat'ri'otism.	अर्थ सांगणें,	to explain'.
स्तब्धता,	si'lence.	विचार करणें,	to consid'er.
स्तब्ध,	si'lent.	टाळणें,	to avoid'.
दुसरे,	others.	उत्तेजन देणें,	to encour'age.
नंतर,	aft'erwards.	करणें,	to commit'.
वागणें,	to behave'.	मान-देणें-राखणें,	to honour.
वागविणें,	to treat.	धर्मशील, धार्मिक,	pio'us.

* ह्याखेरीज आणखी असें लक्षांत आणावें कीं, thou हें एकवचनी सर्वनाम साधारण भाषणांत मुळींच योजित नाहींत. भा० १, पृ० २२, क० १०.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri. Fund

भाषांतरपाठ १५.

८९.—१. वाच. २. तूंच वाच. ३. तुह्मीच जा. ४. हें पुस्तक त्याला दे. ५. तुझे विचार मला सांग. ६. उद्यां येऊं नको. ७. लवकर परत ये. ८. दरवाजा बंद कर. ९. तुमचीं पुस्तकें मिटा. १०. आपण त्याला बक्षीस देऊं या. ११. त्याला वैद्याचें घर दाखीव. १२. खालीं बसा. १३ पुढें ये. १४. अधिक जवळ ये. १५. रामाला येथें पाठीव. १६. आपण बाहेर जाऊं या. १७. दुष्ट माणसांची स्तुति करूं नका. १८. आपण तें काम खुशीनें करूं या. १९. एवढीं वस्त्रें धू बघूं. २० हसूं नको. २१. असें आहे काय ? २२. होय, असें आहे. २३. मला असें वाटतें. २४. तूं आपला अपराध छपवूं नको. २५. मला आणीक शाई दे. २६. त्याच्यावर विश्वास ठेवूं नको. २७. हें दूध पी. २८. त्याला इकडे आण. २९. तूं तरी त्याला बोलाव. ३०. तूं आपलें पुस्तक उघड. ३१. त्या शब्दाचा पुनः उच्चार कर. ३२. मी तुला एक गोष्ट सांगतों.* ३३. खोटें बोलूं नको. ३४. ह्या वाक्याचें भाषांतर कर. ३५. मला क्षमा करा.

१. Do not *steal*. २. Do not *abuse* others. ३. Do not *kill*. ४. Do not *defraud*. ५. *Honour* thy father and mother. ६. *Remember* this well. ७. Do not *behave* foolishly. ८. *Avoid* the company of wicked men. ९. He wants good company. १०. A good name is better than precious ointment. ११. *Let us help* our friends. १२. *Let us* not *encourage* flatterers. १३. Patriotism is one of the noblest virtues. १४. Shall I ever again see such holy men ? १५. I shall never again see so many † men and women together

* अशा ठिकाणीं भविष्य काळ घालावा.

† So many = इतके. So much=एवढा, इतका.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

१६. *Let them* not *shut* the shop so soon. १७. Why do you call him back so soon? १८. I do not want so much rice. १९. Where do you keep your books? २०. Why do you place your book here? २१. *You explain* this sentence to him. २२. *Be* silent. २३. *Consider* well. २४. *Treat* him kindly. २५. He has always a noble appearance. २६. What are your thoughts? २७. *Do give* some bread to that poor man. २८. Do virtue and vice ever go together? २९. Do not *beat* the dog, it will bite you. ३०. *Be* pious and thou wilt be happy.

धडा १६.

संबोधन.

९०. प्रथमेचा **संबोधना**सारखाही प्रयोग होतो. कधीं कधीं संबोधनाच्या पूर्वीं O अरे, अगे, अहो, हें उद्गारवाची अव्यय असतें. संबोधन मराठीप्रमाणें वाक्याच्या आरंभीं, मध्यें, किंवा शेवटीं येतें आणि त्याला उपपद लागत नाहीं.

९१. शब्दसंग्रह १६.

बांधणें,	to bind.	पूर्वींचा-ची-चें,	for'mer.
पळून जाणें,	to flee.	आळशी, मंद,	ind'olent.
वर्तणें,	to act.	नगरवासी,	a cit'izen.
सोडून जाणें,	to forsake'.	भाषण,	a speech.
शौर्य,	bra'very, val'our.	महाराज,	sir:*
विचाराविरुद्ध,	absurd'.	बाईसाहेब,	mad'am.*

---

* संबोधनाखेरीज ह्या दोन शब्दांचा प्रयोग होत नाहीं. Madam हा शब्द विवाहित स्त्रियांला मात्र लावतात. अविवाहित स्त्रियांला व मुलींला miss व लहान मुलांला master म्हणावें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

९२.—१. Flee not, *soldiers!* २. Remember your former valour, *soldiers!* ३. Do not bind that man, *soldiers!* He is our friend. ४. You have no wisdom, *citizens!* ५. Hear me more attentively, *my friends!* ६. Do not do absurd things, *my son!* ७. You are indolent, *Rama!* ८. You were acting wisely, *Robert!* ९. How many* are you, *my good girl?* १०. Forsake not my law! ११. Friends and flatterers will forske the unhappy monarch.

भाषांतरपाठ १६.

१. अरे मुला, तूं माझें ऐक. २. रामा, तूं काय करित होतास? ३. नंतर तूं कोठें जाशील? ४. गणू, हें पाणी ऊन आहे. ५. बाबा,† गवळी दूध कोठून आणतो? ६. वेणू, कांगे रडतेस? ७. मुलांनो, ह्या गोष्टीची चांगली आठवण ठेवा. ८. मुला, मी कोण आहें व माझें नांव काय? ९. ही नाव कोणाची? १०. मित्रा, तूं काल कोठें जात होतास? ११. त्या बिचारीचा नवरा तिला सोडून जात होता. १२ .महाराज, मी जाऊं का? १३. तात्या, मला रजा देतां का? १४. बाईसाहेब, आपला काय हुकूम आहे? १५. तुला त्याचें किती देणें आहे?

धडा १७.

भूत काळीं क्रियापदें चालविण्याचे प्रकार.

९३. इंग्रेजींत क्रियापदें चालविण्याचे प्रकार दोन आहेत; त्यांस weak conjugation आणि strong conjuga-

* कितीजण. † Papa! तसेंच आई = mamma!

Sanskrit University, Balmeeki Campus, K

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

tion असें ह्मणतात. ज्यांचा भूत काळ व भूतकाळवाचक धातुसाधित हीं *ed* हा प्रत्यय लागून होतात, तीं पहिल्या प्रकारचीं होत. उदाहरण—

To melt,	melt*ed*,*	melt*ed*.

इंग्रेजींत एकंदर सुमारें ४००० क्रियापदें आहेत, त्यांपैकीं बहुतेक ह्या प्रकारचीं आहेत.

९४. *Ed* हा प्रत्यय लावतांना भाग १, पृ० २२ कलम ६, ७, ८, व ९ ह्यांत सांगितलेले नियम लक्षांत ठेवावे; जसें—

To nod,	nod*d*ed,	nod*d*ed.
To permit',	permit'*t*ed,	permit*t*ed.
To cry,	cr*i*ed,	cr*i*ed.
To hate,	hate*d*,	hate*d*.

९५. Weak conjugation चीं क्रियापदें **भूत काळीं** कशीं चालतात, हें खालीं दिलेल्या उदाहरणांवरून समजावें.

To learn **ह्याचा भूत काळ.**

१. I learn*ed*.	We learn*ed*.
२. Thou learn*edst*.	You learn*ed*.
३. He, she, it learn*ed*.	They learn*ed*.

---

* क्रियापदाच्या शेवटीं *ch*, *ck*, *p*, *sh*, *x*, किंवा *ss* हीं अक्षरें असलीं तर *ed* चा उच्चार ट् सारखा होतो; जसें—To crush चिरडणें, crush*ed*; To tax कर बसविणें, tax*ed*. क्रियापदाच्या शेवटचा उच्चार ट् किंवा ड् असला तर *ed* ह्या प्रत्ययाचा उच्चार एड् होतो; जसें—To rest विश्रांति घेणें, rest*ed*; To hate द्वेष करणें, hat*ed*; To fade कोमजणें, fad*ed*; एरवीं *ed* चा उच्चार ड् असा होतो; जसें—To fear, fear*ed*; To laugh, laugh*ed*; To play, play*ed*; To cry, cri*ed*; To love, lov*ed*.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

भूत काळीं द्वितीय पुरुषीं एकवचनीं *st* असा प्रत्यय लागतो, *est* लागत नाहीं.

९६. भूत काळाचा **रीतिभूत काळा**प्रमाणेंही प्रयोग होतो; जसें—

He learned, **तो शिकला,** किंवा **तो शिकत असे.**

९७. **अकरणरूपी** व **प्रश्नरूपी** वाक्यांत do ह्या सहाय क्रियापदाचा भूत काळ did हा योजावा व मुख्य क्रियापदाचा कांहींएक फेरफार करूं नये; जसें—

He did not *learn.* **तो शिकला नाहीं.**

Did he learn? **तो शिकला काय?**

द्वितीय पुरुषीं एकवचनीं did ह्याचें did*st* असें रूप होतें.

९८. ☞ **पढणें, शिकणें, पिणें, बोलणें, ह्मणणें, विणें, भिणें,** इत्यादि ज्या क्रियापदांवरून भूत काळीं मराठींत कर्मणि किंवा भावि प्रयोग होत नाहीं* त्या अर्थाच्या क्रियापदाखेरीज सामान्यतः कोणत्याही इंग्रेजी सकर्मक क्रियापदाचें भूत काळीं मराठींत भाषांतर करतांना तृतीयान्त कर्ता करून कर्तरिबद्दल **कर्मणि** किंवा **भावि** प्रयोग योजावा; जसें—

He showed me the way.

त्यानें मला वाट दाखविली.

I beat him.

मीं त्याला मारलें.

परंतु He learned his lesson.

तो आपला धडा शिकला.

---

* दादोक्त महाराष्ट्र व्याकरण 'प्रयोगविचार' पहा.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

९९. शब्दसंग्रह* १७.

शोधून काढणें,	to discov'er.† to invent'.	साफ, निक्षून,	flat'ly.
		एकदम,	at once(वन्स्).
नक्कल करणें,	to cop'y.	पहिल्यानें,	at first.
नाश करणें,	to ru'in.	शेवटीं,	at last.
नकी झणणें,	to decline'.	भेटणें,	to vis'it.
कबूल करणें,	to confess'.	व्यत्यय आणणें, उपद्रव देणें,	to disturb'.
ओळखणें,	to rec'ognize.		
चकित करणें,	to aston'ish.	अर्थ,	the mean'ing.
उलट बोलणें,	to contradict'.	छापणें (ना०),	print'ing.
विझवणें,माल०,	to exting'uish.	कला,	an art.
(अन्यायानें) दोष लावणें,	to wrong.	केळें,	plan'tain.
उधळणें व्यर्थ खर्चणें,	to waste.	(बंदुकीची)दारू,	gun'powder.
		गोळा-ळी,	a bullet,a ball.
संपविणें,	to fin'ish.	पुढारी,	a lead'er.
अगदीं,निःशेष, एकंदर,	altogeth'er.	शत्रु,	an en'emy.
वाफेचें यंत्र,	steam-en'gine.	गोष्ट, देण्याकरितां पुढें केलेली वस्तु,	an of'fer.
कैदी,बंदिवान,	a pris'oner.		

भाषांतरपाठ १७.

१००.—१. मीं त्यांना कधीं कधीं भेटत असें. २. रामा

---

* भाषांतर करतांना एखाद्या इंग्रेजी शब्दाला कोशांतील मराठी शब्द जुळत नसला तर त्याच अर्थाचा दुसरा शब्द घालावा. भाग २ कलम ५ पहा.

† To discover=जी वस्तु आहे ती उघडी करणें किंवा उघड दशेस आणणें. To invent=एखाद्या नव्या वस्तूची युक्ति किंवा कल्पना काढणें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

आणि गोविंदा बहुतकरून एकत्र खेळत असत. ३. मीं त्याला उपद्रव दिला नाहीं. ४. मला तें मूल फार आवडत असे. ५. तूं मला फार भीत असस. ६. त्यानें मला आपलीं नवीं वस्त्रें दाखविलीं. ७. त्यानें आपला अपराध कबूल केला. ८. मीं त्याला ओळखिलें नाहीं. ९. त्याला माझा वहीम आला. १०. न्यायाधिशानें त्याला क्षमा केली. ११. त्या लोकांनीं त्यांचा लागलाच पराभव केला. १२. मुलांनीं आपले धडे संपविले. १३. चाकरानें दिवा विझविला. १४. शिपायांनीं शत्रूच्या पुढाऱ्याला जखमी केलें. १५. त्यानें पोषाक केला.* १६. ह्या वाक्यांचा अर्थ सांग.† १७. मुलांनीं शब्दांचा उच्चार बरोबर केला नाहीं. १८. आमच्या पंतोजीनें आह्मांला पुष्कळ उत्तेजन दिलें. १९. तो वाईट रीतीनें वागत असे. २०. त्यानें मला नेहमीं टाळावें. २१. पंतोजीनें मुलांला वाक्याचा अर्थ सांगितला. २२. आमच्या चाकरानें तुझ्या (पैशाच्या) पिशवीला हात लावला नाहीं. २३. आह्मीं त्याचे फार आभार मानले. २४. मी त्याला असें विचारलें. २५. रामानें रावणास मारिलें.

१. He visit*ed* me and I visit*ed* him almost daily २. We generally work*ed* and play*ed* together. ३. The poor workman ruin*ed* himself. ४. The prisoner confess*ed* his crime at last. ५. We recognize*d* him at once. ६. I finish*ed* my work at last. ७. The cap-

---

* He dressed himself.

† Give the meaning of this sentence. येथें to tell हें क्रियापद येत नाहीं; कारण त्याच्या पुढें (to tell the truth, to tell a story, इत्यादि वाक्यें खेरीजकरून) ज्यास कांहीं सांगावयाचें त्याचें उच्चारण करणें अवश्य आहे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

tain *did* not like me at first. ८. Columbus discover*ed* America. ९. Gutenberg invent*ed* the art of printing. १०. Who invent*ed* the steam-engine? ११. I *did* not write a letter to my aunt yesterday. १२. Why *did* you disturb the officer? १३. I cop*ied* my letter again. १४. I decline*d* his offer. १५. I *did* not suspect you. १६. Love your enemies. १७. The news of the accident astonish*ed* him greatly. १८. I offer*ed* him some plantains. १९. He ow*ed* a large sum of money to the lawyer. २०. You wrong me.* २१. The young man contradict*ed* him flatly. २२. He was altogether wrong. २३. He *did* not satisfy me. २४. Why *did* you waste so much money? २५. The soldiers wast*ed* much gunpowder and many bullets.

धडा १८.

Strong Conjugation.

१०१. ज्या क्रियापदांचा भूत काळ व भूत कालवाचक धातुसाधित हीं *ed* लागून होत नाहींत, परंतु शब्दांतच कांहीं फेरफार होतो, तीं Strong conjugation चीं आहेत असें समजावें; उदाहरण—

To do, *did*, *done*.

अशीं क्रियापदें सुमारें दोनशें आहेत. तीं बहुतेक एकावयवी आहेत; आणि जीं थोडीं दोन अवयवांचीं आहेत, तीं त्या एकावयवी क्रियापदांना उपसर्ग लावून झालेलीं आहेत. उदाहरण—

To give,	gave,	given.
To forgive,	forgave,	forgiven.

---

* तुह्मी मला उगीच दोष लावतां, तुह्मी माझा अन्याय करतां.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

१०२. हीं क्रियापदें **भूत काळीं** चालवितां यावीं, ह्याकरितां त्यांचीं भूत काळाचीं साधारण रूपें पाठच केलीं पाहिजेत, मग कांहीं अडचण नाहीं. एवढें मात्र लक्षांत ठेवावें कीं भूत काळाच्या रूपाच्या शेवटला वर्ण *e* हा असला तर द्वितीय पुरुषीं एकवचनीं *st* नाहींतर *est* हा प्रत्यय लावावा, व वर्तमान काळीं लावतांना जे फेरफार करावे लागतात ते भूत काळींही केले पाहिजेत. उदाहरणें—

To write,	**भू०** wrote,	**द्वि० पु० ए० व०**	wrote*st*.
To run,	ran,		ran*nest*.
To beget′,	begot′.		begot*test*.

Did, was, आणि had ह्यांचीं द्वितीय पुरुषाचीं एकवचनें नियमाविरुद्ध did*st*, was*t* व had*st* अशीं होतात.

१०३. Strong conjugation च्या क्रियापदांपैकीं मुख्य खालीं दिलीं आहेत.

क्रियापद.	**भू० का०**	**भू० धा०**
To go,	went,	gone.
To sit,	sat,	sat.
To run,	ran,	run.
To come,	came,	come.
To stand,	stood,	stood.
To fall,	fell,	fallen.
To hear,	heard,	heard.
To sleep,	slept,	slept.
To teach,	taught,	taught.
To sing,	sang,	sung.
To dig,	dug,	dug.
To spit, **थुंकणें,**	spat, spit,	spit.
To see,	saw,	seen.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

क्रियापद.	भू० का०	भू० धा०
To take,	१२ took,	taken.
To buy,	४ bought,	bought.
To sell,	१० sold,	sold.
To fly,* उडणें,	११ flew,	१० flown.
To flee, पळणें,	fled,	fled.
To read,	५ read,	५ read.
To write,	wrote,	८ written.
To beat,	६ beat,	६ beat'en, ६ beat.
To do,	did,	७ done.
To catch,	४ caught,	caught.
To swim,	swam,	swum.
To sink,	१ sank,	sunk.
To kneel,	knelt,	knelt.
To shine,	४ shone,	shone.
To throw,	११ threw,	१० thrown.
To bring,	४ brought.	brought.
To drink,	१ drank,	drunk.
To grow,	११ grew,	१० grown.
To shut,	shut,	shut.
To fight,	४ fought,	fought.
To lie, पडणें,	२ lay,	lain.
To lay, ठेवणें,	laid,	laid.
To speak,	spoke,	१० spoken,
To send,	sent,	sent.
To lend,	lent,	lent.
To build,	८ built,	built.
To hide,	hid,	८ hid'den.

* To fly हें क्रियापद कधीं कधीं पळणें ह्या अर्थीही आढळतें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

क्रियापद.	भू० का०	भू० धा०
To know,	knew,	known.
To show किंवा shew,	showed, shewed,	shown, shewn.
To be,	was,	been.
To eat,	ate,	eat'en.
To cut,	cut,	cut.
To think,	thought,	thought.
To have,	had,	had.
To make,	made,	made.
To sweep,	swept,	swept.
To spin,	spun,	spun.
To break,	broke,	broken.
To become',	became',	become'.
To weep,	wept,	wept.
To swear,	swore,	sworn.
To spend,	spent,	spent.
To hurt,	hurt,	hurt.
To tear,	tore,	torn.
To drive,	drove,	dri'ven.
To creep,	crept,	crept.
To blow,	blew,	blown.
To win,	won,	won.
To lose,	lost,	lost.
To shake,	shook,	shaken.
To get,	got,	got.
To forget,	forgot',	forgot'ten.
To burn,	burnt, burned,	burnt, burned.
To rise,	rose (रोज),	ris'en.
To set,	set,	set.
To say,	said,	said.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

क्रियापद.	भू० का०	भू० धा०
To tell,	told,	told.
To give,	gave,	given.
To cost,	cost,	cost.
To forgive,	forgave',	forgiv'en.
To bite,	bit,	bit'ten.
To feel,	felt,	felt.
To find,	found,	found.
To sow,	sowed,	sown.
To mow,	mowed,	mown.
To pay,	paid,	paid.
To saw,	sawed,	sawn.
To put,	put,	put.
To steal,	stole,	stol'on.
To weave,	wove,	wov'en,
To bind,	bound,	bound.
To ring, घांट वाजणें·वाजविणें,	rang,	rung.
To ride, वर बसणें,	rode,	ridd'en.
To spill, सांडणें, हिसळणें,	spilt,	spilt.
To sting, नांगी मारणें,	stung,	stung.
To swell, फुगणें,	swelled,	swol'len.
To wear, { आंगावर घेणें, अंगांत घालणें,	wore,	worn.
To arise', उठणें,	arose,	aris'en.
To awake', जागृत करणें·होणें,	awoke,	awaked'.
To bear, प्रसवणें,	bore,	born'.*

*Born जन्मलेला हें धातुसाधित विशेषणात्मक आहे व तें क्रियापदाच्या पुढें येतें; जसें—It is *born* तें जन्मलें आहे. इतर धातुसाधितांच्या प्रमाणें त्याच्या योगानें to bear ह्याचे पूर्णवर्तमान, पूर्णभूत, इत्यादि काळ साधतां येत नाहींत. तसल्या काळांची अपेक्षा असल्यास to bring forth, to give birth to हीं त्याच अर्थाचीं क्रियापदें योजावीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

क्रियापद.	भू० का०	भू० धा०
To bear, वाहणें, सोसणें,	bore,	borne.
To begin', आरंभ करणें,	began',	begun'.
To behold, पाहणें,	beheld,	beheld.
To bend, वळणें, वळवणें,	bent,	bent.
To beseech', विनंती करणें,	besought',	besought'.
To chide', धमकावणें,	chid,	chid'den.
To choose, निवडणें,	chose,	cho'sen.
To clothe, वस्त्र नेसविणें,	clothed,	clothed, clad.
To crow, आरवणें,	crowed, crew,	crowed.
To draw, ओढणें,	drew,	drawn.
To dream, स्वप्न पडणें-पाहणें,	dreamt,	dreamt.
To dwell, वास करणें,	dwelt,	dwelt.
To feed, चारणें, अन्न पुरवणें,	fed,	fed.
To spread, पसरणें,	spread,	spread.
To fling, झोंकणें, फेंकणें,	flung,	flung.
To forsake', सोडून जाणें,	forsook,	forsak'en.
To freeze, गोठणें, गोठवणें,	froze,	froz'en.
To gild, मुलामा देणें,	gilt,	gilt.
To grind, दळणें,	ground,	ground.
To hang, लोंबणें,	hung,	hung.
To hang, *टांगणें, फांशी देणें,	hanged,	hanged.
To hold, धरणें,	held,	held.
To keep, राखणें,	kept,	kept.
To lead, वाटेनें नेणें,	led,	led.
To leave, सोडणें,	left,	left.
To thrust, खुपसणें,	thrust,	thrust.
To mean, उद्देशणें,	meant,	meant.

* हें weak conjugation चें आहे.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

क्रियापद.	भू० का०	भू० धा०
To meet, भेटणें,	met,	met.
To seek, शोधणें,	sought,	sought.
To shear, कातरणें, भादरणें,	sheared,	shorn.
To shoe, नालबंदी करणें,	shod,	shod.
To shoot, बंदुकीनें मारणें,	shot,	shot.
To wring, पिळणें,	wrung,	wrung.
To wind, गुंडाळणें, वेटाळणें,	wound,	wound.

१०४. शब्दसंग्रह १८.

कोंकरूं,	a lamb.	हळू,	slow'ly.
कृमि, कीटक,	an in'sect.	नमन,	a bow.
लिलांववाला,	an auctioneer'.	साप,	a se'rpent.
देणगी, बक्षीस,	a pres'ent.	ठकविणें,	to deceive'.
कांटा,	a fork.	गाळणें, सोडणें,	to omit'.
आंबा,	a man'go.	भयंकर,	fear'ful.
गेल्या रात्रीं,	last night.	सपाट,	flat.
आज रात्रीं,	to-night.	कित्येक,	sev'eral.
आणखी, ही, पण,	al'so.	दूर,	away'.
		दुसरा,	other.*

भाषांतरपाठ १८.

१०५.—१. I like little lambs better than any other animals. २. The best and wisest of men sometimes deceive themselves. ३. Most men see the faults of others sooner than their own. ४. You always see the faults of others; do you ever see your own? ५. A

* कोणताही दुसरा = another; अमुक दुसरा = the other. Another हा एकच शब्द आहे असें मानावें व त्याचा उच्चार अनदर् असा करावा.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

rich man is often the slave of his riches. ६. Those birds will leave our garden altogether. ७. The boys *caught* some flies and other insects. ८. The auctioneer *sold* all those things. ९. My friend *sent* me a present. १०. The girl *hurt* herself. ११. The old woman *told* her many stories. १२. You omitted several words. १३. Will you return to-night? १४. His eldest son *became* a sailor. १५. My brother *lost* his stick. १६. They *lost* all their money. १७. All* the children *were* there. १८. I *fell* down and *hurt* my knees. १९. Will you tell them so? २०. *Did* you ever see so† wise a judge? २१. Who ever *saw* such a monarch? २२. I never *heard* such a thing before. २३. *Did* you ever hear such a wonderful story before? २४. Is he so bad? २५. Which of you *broke* the window? २६. He *gave* me some handkerchiefs. २७. Several of those old houses *had* flat roofs. २८. He *bought* some knives and forks. २९. I *paid* the man seven rupees. ३०. The little boy *got* a new satchel. ३१. *Did* you ever see a lion? ३२. Give me a glass of milk. ३३. He *made* me a bow. ३४. He *did* not say a word. ३५. The servant *swept* my room. ३६. Who *ate* those mangoes? ३७. The old man *drove* the dog away. ३८. The cat *caught* some mice last night. ३९. Who *broke* this lamp? ४०. The sun *shone* and the birds *sang* merrily.

---

* The हें उपपद all ह्याच्या पुढें येतें.

† So ह्या क्रियाविशेषणाचा विशेषणाशीं संबंध असून पुढें नाम असलें तर, a किंवा an हें उपपद विशेषणाच्या पुढें येतें. बहुवचनीं अशा ठिकाणीं so बद्दल such घालतात; जसें—such wise judges. Such ह्याच्या पुढें एकवचनीं नाम असलें तर a किंवा an विशेषणाच्या पूर्वीं येतें; जसें—such a wise judge.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

१. हा सुंदर आरसा त्वां फोडला काय? २. नाहीं, महाराज! मीं फोडला नाहीं. ३. तुह्मांस असें कोणीं सांगितलें? ४. स्वतः मलाच तुझा वहीम आला. ५. मला असें वाटलें. ६. रामाही असें ह्मणाला. ७. ही कोणाची मुलगी? ८. ती आपल्या शेजाऱ्याची. ९. नंतर तुह्मी कोठें गेलां? १०. मला आठवत नाहीं. ११. त्याला एवढीं मोत्यें देतोस का? १२. तुह्मी तीं परत कां करितां? १३. त्यांची किंमत काय आहे? १४. त्याच्या जवळ पुष्कळ हिरे होते. १५. त्या सद्गुणी पुरुषानें अशी गोष्ट कधींही केली नाहीं. १६. कैदीला ही गोष्ट ठाऊक होती काय? १७. तेथें कितीजण होते? १८. तुला किती रुपये पाहिजेत? १९. तूं किती साखर आणली? २०. त्यानें किती तेल विकत घेतलें? २१. तिनें हें पुस्तक निवडलें. २२. त्यानें तुतारी वाजवली. २३. वारा वाहत होता. २४. हें मडकें कोणीं फोडलें? २५. शिंप्यानें कापड फाडलें. २६. गाडीवाल्यानें लागलीच गाडी हांकली. २७. त्याला कुत्रा चावला. २८. साप हळू हळू सरपटत चालला होता. २९. ह्या खुर्चीला मला दोन रुपये पडले. ३०. तूं इतके पैसे कां खर्चले? ३१. तो कोठें होता? ३२. तूं ते पैसे उसने कां घेतले? ३३. मला रामाचे पुष्कळ रुपये देणें आहे. ३४. त्यानें मला पैशाची मोठी रक्कम उसनी दिली. ३५. हें सर्व तुला कोणीं शिकविलें? ३६. हे सगळे भाऊ विद्वान् आहेत. ३७. त्यांपैकीं एकजण मजवर फार प्रीति करीत असे. ३८. मीं एक भयंकर आवाज ऐकला. ३९. तो पाणी प्याला. ४०. तुला वाट कोणीं दाखविली?

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

धडा १९.

पूर्णवर्तमान काळ.

१०६. "भूत काळीं आरंभलेली क्रिया वर्तमान काळीं संपलेली आहे, किंवा भूत काळीं केलेल्या क्रियेचें फळ वर्तमान काळीं सिद्ध आहे" असा अर्थ असतां **पूर्णवर्तमान** काळ* योजावा. क्रियापदाच्या भूतकालवाचक धातुसाधिताच्या पूर्वीं to have ह्याचा वर्तमान काळ ठेविला ह्मणजे त्या क्रियापदाचा **पूर्णवर्तमान** सिद्ध होतो; उदाहरण—

To write **ह्याचा पूर्णवर्तमान.**

	एकवचन.	**अनेकवचन.**
१.	I have written.	We have written.
२.	Thou hast written.	You have written.
३.	He, she, it, has written.	They have written.

ह्याचे अर्थ, **मीं लिहिलें आहे, तूं लिहिलें आहे,** इ०, असे होतात.

१०७. ☞ कोठें कोठें इंग्रेजींत पूर्णवर्तमान असतो तेथें मराठींत शुद्ध भूत काळ घालावा लागतो; जसें—

Where *have* you *been* all this time?

एवढा वेळ तुह्मी कोठें होतां?

तसेंच कोठें अपूर्णवर्तमान असतो तेथें पूर्णवर्तमान घालावा लागतो; जसें —

Why *are* you *sitting* here?

तूं येथें कां बसला आहेस?

---

* ह्या काळाला मराठी व्याकरणांत वर्तमानभूत ह्मणण्याची रूढी पडली आहे, परंतु पूर्णवर्तमान हें नांव त्याला अधिक शोभतें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

१०८. इंग्रेजींत have been ह्याला क्रियापदाचें वर्तमान कालवाचक धातुसाधित जोडल्यानें एक काळ होत असतो. त्याचा असा अर्थ होतो कीं भूत काळीं आरंभलेली क्रिया वर्तमान काळापर्यंत चालत आहे, मग ती अझून संपलेली असो किंवा नसो; अशा प्रकारचा निराळा काळ मराठींत नाहीं, परंतु मराठींतल्या अपूर्णवर्तमानाचा तसा अर्थ कधीं कधीं होतो; व इंग्रेजीचें भाषांतर करतांना तोच काळ योजावा; जसें—

I have been writing, **मी लिहीत आहें, मी लिहीत बसलों आहें.**

१०९. शब्दसंग्रह १९.

अनुसरणें,	to fol'low.	परदेशचा मनुष्य,	a for'eigner.
काम,	a bu'siness.	हवा,	the weather
सेनापति,	a gen'eral.	धैर्य,	for'titude.
भक्ष्य,	a prey.	मुख्य,	chief. / prin'cipal.
तिरंदाज,	an arch'er.	शक्ति, बळ,	might.
बाण, तीर,	an ar'row.	हक्क,	right.
बाहुली,	a doll. / a pup'pet.	विलंब, खोळंबा,	delay'.
अंगठी,	a ring.	उपदेश,	advice'.
पीठ,	flour.	उपदेश करणें,	to advise'.
दांत दुखणें,(ना०)	tooth'ache.	नीति,	moral'ity.
लादणें,	to load.	भयाचा धोक्याचा,	dan'gerous.
आगमन, पोहोंचणें,(ना०)	arri'val.	छपवून ठेवणें,	to conceal'.
वर्तणूक,	beha'viour.	बंदींत टाकणें,	to impris'on.
तुरुंग,	a prison.		

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

पश्चात्ताप पावणें,	to repent'.	अझून,	yet, still.
आमंत्रण करणें,	to invite'.	डाळिंब,	a pome'granate.*
उपेक्षणें, अनादर करणें,	to disregard'.	उधळणें, उडवणें,	to squan'der.
देखील, सुद्धां,	e'ven.	ओढणें, काढणें,	to draw.

भाषांतरपाठ १९.

११०.–१. त्यानें चांगले आंबे निवडले आहेत. २. एथें दहा आंबे आहेत त्यांतून तूं कोणते निवडले आहेस ? ३. त्या मुलीनें आपल्या बाहुलीला चिरगुटें नेसविलीं आहेत. ४. तो अझून आला नाहीं. ५. आमचा पाहुणा आतांच बाहेर गेला आहे. ६. तो आज येथें राहील. ७. कोंबडा आरवतो. ८. चिताऱ्यानें एक सुंदर तसबीर काढिली आहे. ९. घोडे गाडी ओढतात. १० मला स्वप्न पडलें. ११. त्याची टोपी खालीं पडली. १२. ते तेथें पूर्वीं रहात होते. १३. त्यानें तुझी आंगठी चोरिली आहे. १४. त्यानें आपली पाटी फोडली आहे. १५. तुला कोणीं धमकावलें ? १६. त्याला पुष्कळ ग्रंथ सांपडले आहेत. १७. त्यानें पुष्कळ ग्रंथ शोधून काढले आहेत. १८. आह्मीं तें काम आरंभलें आहे. १९. तुझ्या धन्यानें ते डागिणे कोठें ठेविले आहेत ? २० मीं हें अनुभवलें आहे. २१. आपल्या शेजारच्या मुलीनें तें पीठ सांडलें आहे. २२. हें तेल कोणीं सांडलें आहे ? २३. आह्मीं तुला क्षमा केली आहे. २४. मीं त्याला असें सांगितलें आहे. २५. त्यानें तुला काय दिलें आहे ? २६. ही बातमी तुला कोणीं सांगितली ? २७. तूं त्याचे पूर्वींचे अपराध विसरला आहेस. २८. त्या मुलानें

Pome ह्याचा उच्चार पम्.

Sanskrit University, Balmeeki Campus, K

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

आपलीं बोटें भाजलीं आहेत. २९. त्यानें आपली सर्व दौलत उधळली आहे. ३०. तुझ्या कनिष्ठ मुलानें माझा नवा अंगरखा फाडला आहे. ३१. त्या परक्या मनुष्यानें कांहीं पक्षी पकडले आहेत. ३२. मीं तुला ही गोष्ट पूर्वीं सांगितली आहे. ३३. तूं पुष्कळ पैसे मिळविले. ३४. त्यांनीं त्या राजाला बंदींत टाकलें आहे. ३५. त्या व्यापाऱ्यानें मला पुष्कळ मदत केली आहे. ३६. त्याला पश्चात्ताप झाला नाहीं. ३७. मीं त्याला ओळखलें नाहीं. ३८. एका* कोंबड्याला एक रत्न सांपडलें. ३९. त्यांनीं इतकें धैर्य पूर्वीं कधींही दाखविलें नाहीं. ४०. रावण लंकेचा राजा होता. ४१. आह्मीं त्याला पुष्कळ उत्तेजन दिलें. ४२. आह्मीं त्याची खातरी केली आहे. ४३. सेनापतीनें मला बोलावलें आहे. ४४. शेतकऱ्यांनीं शेतें नांगरलीं आहेत. ४५. त्या कामगारानें तुझी शिफारस केली आहे. ४६. त्या पागोट्याला मला फार किंमत पडली. ४७. आतां त्याची किंमत काय येईल? ४८. मला त्याची वर्तणूक आवडत नाहीं. ४९. मीं तुला काय सांगितलें? ५०. कांहीं लोकांला देशबांधवांपेक्षां परदेशचे लोक अधिक आवडतात.

१. We *have left* all and *followed* thee. २. The young lions seek their prey. ३. This weather will freeze the lakes and the rivers. ४. The general *has fed* his troops. ५. The merchants *have loaded* the camels. ६. Will you load that cart? ७. He *has shod* the horse. ८. The woman *has been grinding* corn. ९. The shepherds *have been shearing* the sheep. १०. We *have met* before. ११. Where *have* you *kept* the pomegranates? १२. He kept his word. १३. What

---

* एक—कोणीएक = a, a certain.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fun

do you mean? १४. The artisan is gilding the frame of the mirror. १५. That boy *has been flinging* stones. १६. She is feeding* the infant. १७. Fortitude *has forsaken* him. १८. The gardener *has watered* the plants. १९. I *have* not *seen* you before. २०. The boys *have learnt* their lessons. २१. I *have* never *had* the toothache. २२. Always do your duty. २३. What *has* the prisoner *done*? २४. What did he do? २५. How do you do?† २६. Might is right.‡ २७. Delay is always dangerous. २८. We have finished our work. २९. The thief *has concealed* the ornaments. ३०. The owner *has* not *sold* the house. ३१. You *have paid* the artist a large sum of money. ३२. I *have* not *spent* even a rupee. ३३. You *have forgotten* my advice. ३४. He *has* not *finished* his dinner. ३५. The bird *has flown*.

धडा २०.

शब्दयोगी अव्ययें.

१११. इंग्रेजींत **शब्दयोगी अव्ययें** नामाच्या किंवा सर्वनामाच्या पूर्वीं येतात व तें नाम किंवा सर्वनाम द्वितीयेंत घालावें लागतें.

११२. From **पासून,–हून,** ह्यां शब्दयोगी अव्ययावरून पंचमीचा अर्थ होतो; ¶ जसें—

---

* भरवीत आहे.

† Do ह्याचा अर्थ ह्या वाक्यांत असणें असा आहे.

‡ वळी तो कान पिळी.

¶ तुलना कर्तव्य असतां, मराठींतील पंचमीबद्दल than हें उभयान्वयीं अव्यय योजतात; जसें—

Râmâ is more clever than Gopâlâ.

गोपाळाहून रामा हुशार आहे.

Delhi University, Balmeeki Campus, Koth

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

Calcutta is far *from* Benares.

काशीपासून कलकत्ता दूर आहे.

११३. **अमक्या नियमित भूतकालापासून आतांपर्यंत** असा अर्थ असतां **पासून** ह्याच्याबद्दल since हें शब्दयोगी अव्यय योजावें*; जसें—

I have not seen my brother *since* January.

जानुआरीपासून मीं आपल्या भावाला पाहिलें नाहीं.

परंतु एरवीं कालवाचक नामाच्या पूर्वीं from हें अव्यय घालण्याला कांहीं हरकत नाहीं; जसें—

From that time they loved each other.

तेव्हांपासून ते एकमेकांवर प्रीति करूं लागले.

११४. In व into ह्या शब्दयोगी अव्ययांवरून सप्तमीचा अर्थ होतो. **बाहेरून आंत**† असा गतीचा प्रकार दाखविणें असल्यास into आणि एकाच स्थलीं स्थिति किंवा त्यांतच हालचाल होत असल्यास in हें अव्यय योजावें; जसें—

He plunged his hand *into* the water.

त्यानें पाण्यांत हात बुडविला.

Many animals live *in* water.

पुष्कळ प्राणी पाण्यांत राहतात.

I went *into* the room.

मी खोलींत गेलों.

---

* *From* times immemorial upto the present day अतिप्राचीन कालापासून आजपर्यंत, येथें from हें अव्यय बरोबर आहे, कारण अमक्याच नियमित वेळेपासून असा स्पष्ट अर्थ नाहीं.

† आंतून बाहेर ह्या अर्थी out of हें संयुक्त अव्यय योजावें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

I was *in* the room.

मी खोलींत होतों.

I went *into* the garden.

मी बागेंत गेलों.

He is walking *in* the garden.

तो बागेंत फिरत आहे.

११५. शब्दसंग्रह २०.

गांठ,	a knot.
उमराव, सरदार,	a no'bleman.
राष्ट्र, लोक,	a na'tion.
स्वभाव,	char'acter.
मनोविकार, राग,	a pas'sion.
खोटें बोलणारा,	a li'ar.
आंत जाणें,	to en'ter.
सोवत, संगत,	soci'ety.
घाण, हेंदर,	dirt.
खेळणें (ना०),	a toy.
कमळ,	a lot'us.
घाई, त्वरा,	haste.
वेलदोडा,	a car'damom.
लवंग,	a clove.
जायफळ,	a nut'meg.
केशर,	saff'ron.
फळांची बाग, उपवन,	an orchard.
गोंगाट,	a noise.
अरण्य, रान,	a for'est.
पोकळ डौल,	van'ity.
हलकट-पोकळपणा,	frivol'ity.
दुष्टपणा,	wick'edness
हातीं घेतलेलें काम,	an under-tak'ing.
चमत्कारिक, वेगळा,	pecu'liar.
शिरस्त्याचा, नेहमींचा,	u'sual.
दुर्मुखलेला, तिरसट,	sul'len, gloomy, morose'.
सुका, कोरडा,	dry.
ओला-ली-लें,	wet.
प्रत्येक,	ev'ery.
उलगडणें, सोडणें,	to un'do.
चेंगरणें,	to bruise.
आवरणें, (हुशारीनें) चालवणें,	to man'age.
बिघडविणें,	to spoil.
दिसणें,	to seem, to appear'.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

उतरणें,	to alight', to descend'.	उशिरां, उशिरानें, अलीकडे,	late, क्रि० वि० of late, late'ly.
घेणें, पावणें,	to receive'.	खुषीनें, संतोषानें, अनायासानें,	read'ily.
स्वादिष्ट,	sa'voury.	भयंकर रीतीनें,	dread'fully.
लवकर आलेला,	early, वि०	मोठ्या मानानें,	no'bly.
लवकर,	early, क्रि०वि०	सारासार विचारानें, समजुतीनें,	pru'dently.
उशिरां आलेला,	late, वि०*		

भाषांतरपाठ २०.

११६.—१. We always give advice more readily than money. २. Every nation has its peculiar character. ३. Have we treated our enemies nobly? ४. We see *in* men of all countries the same passions and the same vices. ५. Bad company will spoil a man's character. ६. Vanity and frivolity are not far *from* wickedness. ७. No one felt happy *in* his society. ८. We have many fruit-trees *in* our orchard. ९. Have you any oranges *in* your garden? १०. I saw some beautiful birds *in* the garden. ११. That man was formerly a servant *in* some nobleman's family. १२. Is he so still? १३. I received a letter *from* my father yesterday. १४. Will you undo that knot? १५. How did you bruise your fingers so dreadfully? १६. Did you ever see such a liar *in* all your life? १७. The maid went *into* the kitchen. १८. Who is making that† noise *in* the kitchen? १९. You generally come

---

* Late हें विशेषण असतें तेव्हां त्याचा तारतम्यभाव दाखविणारीं रूपें later, latter, व latest, last अशीं होतात. Later व latest हे शब्द कालवाचक, आणि latter व last हे क्रमवाचक आहेत. Late हें क्रियाविशेषण असतें तेव्हां त्याचीं रूपें later व latest अशीं मात्र होतात.

† That—इतका, एवढा, हा.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri. Fund

very late; to-day you have come earlier than usual. २०. He managed everything most prudently. २१. The children went *into* the forest. २२. He acts prudently *in* all his undertakings. २३. Let us go *into* the house. २४. Do not bring any dirt *into* the room. २५. Birds fly *in* the air. २६. He threw the toy *into* the well. २७. Will you put the fruit *into* this basket? २८. You are late. २९. This man does his work well. ३०. Do help me. ३१. Do make haste. ३२. I do study. ३३. What* a wonderful thing is the steam-engine! ३४. What is steam? ३५. A little boy took a young bird *from* its nest.

१. त्यानें मजपासून पुष्कळ रुपये उसने घेतले. २. मी कालपासून त्याला ही गोष्ट विचारीत आहें. ३. त्या दिवसापासून तो तेथें पुनः कधींही गेला नाहीं. ४. त्या तळ्यांत मीं पुष्कळ कमळें पाहिलीं. ५. मुलानें नदींत धोंडा फेंकला. ६. मी उद्यांपासून तुला शिकविणार नाहीं. ७. ह्या चहांत अधिक साखर घाल. ८. एक स्त्री विहिरींत पडली. ९. बंदरांत पुष्कळ जहाजें आलीं आहेत. १०. नातलगांनीं प्रेत घरांतून बाहेर आणलें. ११. धन्यानें त्या दुष्ट चाकराला घराच्या बाहेर हांकून दिलें. १२. त्यानें माझा चाकू खिडकींतून खालीं टाकला. १३. शिपाई लोक राजवाड्यांत शिरले. १४. तेथें त्यांस काय सांपडलें? १५. आमचे पाहुणे पुण्याहून आले आहेत. १६. तूं पिशवींत काय ठेवलें? १७. ह्या घरांत किती लोक रहातात? १८. त्या घराला एक विहीर आहे. १९. आह्मी गाडींत बसलों. २०. उन्हाळ्यांत जमीन कोरडी होते. २१. तेव्हांपासून तो दुर्मुखलेला

* What हा शब्द आश्चर्यबोधक असतो तेव्हां a हें उपपद त्याच्या पुढें येतें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

आहे. २२. त्याच्या तोंडांतून वाईट शब्द कधींही निघत नसत.* २३. हा मुलगा शाळेंतून आला आहे. २४. वेलदोडे स्वादिष्ट असतात. २५. लवंगा फार उपयोगी असतात. २६. जायफळाचें झाड फार सुंदर दिसतें. २७. एक गृहस्थ व त्याची पत्नी गाडींतून उतरलीं. २८. ही नेहमींची वेळ नव्हे. २९. तूं इतका उशिरां कां आलास? ३०. रामा गोविंदापेक्षां उशिरानें आला.

धडा २१.

शब्दयोगी अव्ययें (पुढें चालू).

११७. To व for ह्या अव्ययांवरून इंग्रेजींत चतुर्थी होते ह्मणून पूर्वीं सांगितलें. आतां त्यांचे दुसऱ्या प्रकारचे कांहीं अर्थ सांगतों.

वाक्यांतलें क्रियापद गतिवाचक असून to च्या पुढें स्थलवाचक नाम असलें तर to चा अर्थ अधिकरणार्थी चतुर्थीसारखा किंवा सप्तमीसारखा होतो; जसें—

He goes *to* school.

तो शाळेस (किंवा) **शाळेंत जातो.**

He went *to* Poona.

तो पुण्यास गेला.

कधीं कधीं to चा अर्थ **कडे, पाशीं** असा होतो; जसें—

He came *to* me.

तो मजकडे आला.

---

* Never came out of, never escaped from.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri. Fund

बद्दल किंवा **अमक्या किंमतीला** असा अर्थ असतां, for ह्याचें भाषांतर **ला** ह्या प्रत्ययानें करावें; जसें—

I bought the book *for* three rupees.

मीं तें पुस्तक तीन रुपयांला विकत घेतलें.

अमुक वेळपर्यंत अशा अर्थीं for बद्दल **पर्यंत** हा शब्द घालावा किंवा कांहीं घातलें नाहीं तरी चालेल; जसें—

He travelled *for* three days.

त्याने तीन दिवसपर्यंत (किंवा **तीन दिवस**) **प्रवास केला.**

११८. At हें अव्यय स्थलवाचक नामाच्या पूर्वीं असलें तर त्याचा अर्थ अधिकरणी चतुर्थीसारखा किंवा सप्तमीसारखा किंवा **पाशीं, जवळ,** असा होतो; जसें—

The train stops *at* Thana.

आगगाडी ठाण्याला थांबते.

In the summer he lives *at* Mahâbaleshwar.

उन्हाळ्यांत तो महाबळेश्वरीं राहतो.

I saw him *at* the gate.

मीं त्याला दरवाज्यापाशीं पाहिलें.

☞ At हें अव्यय प्रांतांच्या किंवा देशांच्या नांवांपूर्वीं येत नाहीं.

अमक्या ठिकाणीं ह्या अर्थीं मोठाल्या शहरांच्या नांवांपूर्वीं in व लहान शहरांच्या नांवांपूर्वीं at हें अव्यय योजावें; जसें—

He is *in* London, but his brother is *at* Dover.

तो लंडन शहरीं आहे, पण त्याचा भाऊ डोव्हर येथें आहे.

To land **उतरणें, तरीस लागणें,** ह्या क्रियापदाच्या पुढें बहुतकरून at हें अव्यय येतें; जसें—

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

He landed *at* Dover.

तो डोव्हर येथें (गलबतांतून) **उतरला.**

टीप.—At ह्या अव्ययाच्या अर्थाचे इतके सूक्ष्म प्रकार आहेत कीं ते सर्व येथें देणें अगदीं अशक्य आहे. उदाहरणें—Look *at* him! त्याच्याकडे पहा! He hurled the chair *at* the man, त्यानें त्या मनुष्याच्या अंगावर खुर्ची फेंकली; He fell *at* his feet, तो त्याच्या पायां पडला; He laughs *at* me तो मला हांसतो; इत्यादि.

११९. सप्तमीचा अर्थ असतां **वेळेचे** जे निरनिराळे विभाग, त्यांपैकीं **दिवसाच्या** पूर्वीं on, दिवसापेक्षां **मोठ्या**-विभागाच्या पूर्वीं in, व **लहान** विभागापूर्वीं at, हें अव्यय येतें. Morning **सकाळ**, evening **संध्याकाळ** आणि afternoon **दोनप्रहर** हे दिवसापेक्षां लहान विभाग असूनही त्यांच्या पूर्वीं in येतें; जसें—

On Monday.	**सोमवारीं.**
In the month of March.	**मार्च महिन्यांत.**
In 1875.	**१८७५ त.**
At seven o'clock.	**सात वाजतां.**
At noon.	**दुपारीं.**
At dawn किंवा day-break.	**अरुणोदयीं.**
In the morning.	**सकाळीं.**

☞ **परंतु कालवाचक नामाच्या** पूर्वीं जर एखादें विशेषण किंवा सर्वनाम असलें, व तेणेंकरून वेळेच्या परिमाणाविषयीं, ह्मणजे **केव्हां** किंवा **किती वेळपर्यंत** ह्याविषयीं स्पष्ट अर्थ होत नसला तर, अव्यय बहुधा घालूं नये आणि कालवाचक नामाची नुस्ती द्वितीया योजावी. हिला इंग्रेजी व्याकरणांत, **कालार्थी द्वितीया** असें ह्मणतात. उदाहरणें—

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri. Fund

I will see you *next Monday.*

मी येत्या सोमवारीं तुला भेटेन.

We had no leave *last year* on this day.

गेल्या वर्षीं ह्या दिवशीं आपणाला रजा नव्हती.

He lived here (for) *two years.*

तो येथें दोन वर्षें राहिला.

ह्याचप्रमाणें एखाद्या पदार्थाचें **अंतर** किंवा **मेज** सांगावयाचें असल्यास नुस्ती द्वितीया योजावी. तिला **परिमाणार्थी द्वितीया** ह्मणतात. उदाहरणें—

That village is *five miles* (distant) from this place.

तें खेडें येथून पांच मैल दूर आहे.

The cloth is *four yards* wide.

तें कापड चार वार रुंद आहे.

१२०. Of ह्या अव्ययाचा अर्थ कधीं कधीं प्रथमेसारखा होतो. हा प्रकार **बेटें, शहरें, गांव, खेडीं,** ह्यांच्या नांवांच्या संबंधानें आढळतो; परंतु **नद्यांच्या** नांवांच्या संबंधानें आढळत नाहीं; जसें—

The island *of* Sumatra,	**सुमात्रा बेट.**
The city *of* Poona,	**पुणें शहर.**
परंतु The river Krishna,	**कृष्णा नदी.**

१२१. शब्दसंग्रह २१.

कचेरी, हपीस, हुद्दा,	an of'fice.	**जोडा, जोडी,**	pair.
टपालाचें हपीस,	a post-office.	**सैन्य,**	an ar'my.
ख्रिस्ती देऊळ,*	a church.		
तुरुंग,	a gaol (जेल).	**अडचण,**	a difficulty.

* मूर्तिपूजक लोकांच्या देवालयाला temple व मुसलमानांच्या मशिदीला mosque असें ह्मणावें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

पीडा, त्रास, तसदी,	trou'ble.	दालचिनी,	cin'namon.
दुःख,	pain.	निर्बल,	weak, effem'. inate.
कष्ट, श्रम, मेहनत,	pains.		
सूर्यास्त,	sun'set.	ईशान्य,	the north-east.
आठवडा,	a week.*	आग्नेय,	the south-east.
निघून जाणें,	depar'ture.	नैर्ऋत्य,	the south-west.
		वायव्य,	the north-west.
चाकरी, काम,	ser'vice. a service.	मुक्त करणें, हवालणें,	to deliv'er.
कल्पित कथा, कादंबरी,	a nov'el.	चढणें,	to rise.
		नेणें,	to car'ry.
प्रांत,	a prov'ince.	विकत घेणें,	to pur'chase.
इलाखा,	a pres'idency.	पाया घालणें, बांधणें,	to found.
पहांट, प्रभात,	dawn. day'break.	पाऊल टाकणें,	to step.
		उतरणें, मुकाम करणें,	to remain'.
दुष्काळ,	a fam'ine.		
फूट,	a foot.†	मर्यादा,	a lim'it. a bound'ary.
घर, स्वगृह,	home.‡		
किंमत,	price.	सुमारें, जवळ,	near'ly.
बाजार,	(a) mar'ket.	कांहींच,	at all.
प्रकार, तऱ्हा,	a sort, a kind.	किमपि,	in the least.
		निदान,	at least.
कारण,	a cause. a rea'son.	सोसणें,	to suf'fer.
		चाळीस,	for'ty.

* इंग्रेजी आठवड्याचे दिवस सात.

† तीन जवांच्या लांबीला an inch ह्मणतात, व बारा इंच ह्मणजे एक फूट.

‡ ज्या घरांत एकादा मनुष्य राहतो तें त्याचें home समजावें. गतिवाचक क्रियापदांवरून नुस्त्या home ह्या शब्दाचा घरीं, घरास, घराकडे, स्वगृहीं असा अर्थ होतो. स्थितिवाचक क्रियापदापुढें घरीं, घरांत, घरामध्यें ह्याला at home असें ह्मणतात.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri. Fund

भाषांतरपाठ २१.

१२२.—१. मला पुढल्या आदितवारीं भेट.* २. गेल्या वर्षीं ह्या प्रांतांत पुष्कळ† पाऊस पडला. ३. मुंबईत दरवर्षीं किती पाऊस पडतो? ४ तो दर शनिवारीं माझ्या घरीं येत असतो. ५. काल सकाळीं मी जेवलों नाहीं. ६. तुह्मी आज संध्याकाळीं‡ येथें या. ७. मी दुपारीं बाहेर जाईन. ८. त्या वर्षीं बंगाल इलाख्यांत फार पाऊस पडला. ९. बंगाल इलाख्यांतले लोक श्रीमंत आहेत काय? १०. कांहीं लोक ठक असतात. ११. ह्याचें कारण काय आहे? १२. सिंधु§ नद हिंदुस्थानाची|| वायव्य मर्यादा आहे. १३. कांहीं इंग्रेज ¶ हिंदुस्थानांत राहातात. १४. मीं त्याला गेल्या महिन्यांत पुण्यास पाहिलें. १५. पावसाळ्यांत तो कलकत्त्यांत राहातो. १६. त्यानें सिंव्हलद्वीपांत** दोन महिने मुकाम केला. १७. सिंव्हलद्वीपांत दालचिनीच्या झाडांचीं मोठमोठालीं अरण्यें आहेत. १८. मी गेल्या महिन्यांत ठाण्यांत होतों. १९. गेल्या वर्षीं आह्मीं मुंबई शहर पाहिलें. २०. पुणें शहरीं माझे पुष्कळ मित्र आहेत. २१ मला तो गृहस्थ राजवाड्याच्या दरवाज्यापाशीं आढळला. २२. तुह्मी उन्हाळ्यांत महाबळेश्वरास कां गेलां नाहीं? २३. तुझ्या करितां

---

* भेट=See. दिवसांचीं नांवें—Sunday, Monday, Tuesday, Wednesday, Thursday, Friday, Saturday. Wednesday ह्या शब्दांतील पहिल्या *d* चा उच्चार करूं नये.

† पुष्कळ पाऊस=much rain, plenty of rain.

‡ This evening.

§ सिंधु नद=the river Indus. || हिंदुस्थान= India.

¶ इंग्रेज लोक=Englishmen.

** सिंव्हल=Ceylon.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

मीं पुष्कळ अडचणी सोसल्या. २४. सैन्य बडोद्यास गेलें आहे. २५. गेल्या आठवड्यांत मीं घराच्या बाहेर पाऊल टाकलें नाहीं. २६. त्याचा शिक्षक दररोज पहांटेस येत असतो. २७. आह्मी सकाळीं स्नान करितों. २८. नंतर आह्मी घरीं आलों. २९. तो घरीं आहे. ३०. तो आपल्या घरीं गेला. ३१. मी घरीं असेन. ३२. तो आपल्या घरीं आहे. ३३. तुमचा मुलगा आमच्या घरीं आहे. ३४. तुमच्या घरीं पाहुणे कोण आले आहेत? ३५. बाजारांत जा. ३६. ह्या पेटीचे तुह्मांला निदान पांच रुपये पडतील. ३७. मी ह्या पेटीचे* निदान पांच रुपये घेईन. ३८. ही पेटी तुह्मांला पांच रुपयांखालीं† मिळणार नाहीं. ३९. कांहीं हिंदु लोक इंग्लंडास‡ गेले आहेत. ४०. तूं त्या वेळीं§ तेथें होतास.

१. *At* what hour shall I come? २. He holds his office *for* life. ३. Will you take this letter and deliver it *for* me *at* the post-office? ४. He goes to church *on* Sundays. ५. The young physician is rising *to*¶ wealth and honour. ६. My servant brought the stranger to me. ७. They carried the prisoners *to* the gaol. ८. I sent him a present. ९. I have received no letter from you since your departure from this town. १०. Have you sent any letter to our friend lately? ११. He received no reward from you *for* his former services? १२. We travelled *for* many months. १३. I purchased this horse *for* a large

---

* For this box. † For less than. ‡ इंग्लंड=England
§ At the time किंवा at that time. ¶ ला.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

sum of money. १४. *For* how much did you purchase this novel? १५. What did you pay *for* this pair of shoes?* १६. What did this pair of shoes cost you? १७. *At*† what price did you buy this oil? १८. I bought this pair of bullocks *for* forty rupees. १९. What did you see in the island *of* Ceylon? २०. *For* whom are you taking all this trouble? २१. We feel grief *at* the loss of friends.‡ २२. The two armies met§ at Panniput. २३. Romulus founded the city *of* Rome. २४. We will go out *at* sunset. २५. The merchant then went *to* England and lived *at* Liverpool. २६. We remained *at* Sholapur nearly three weeks. २७. *At* what hour shall I come? २८. The children are going *to* school. २९. That room is ten feet long, eight feet wide, and seven feet high. ३०. What is the depth of that well? ३१. We get good tea from China, Assam and the Kangra Valley. ३२. Coffee comes from Coorg and Wynaad.

धडा २२.

शब्दयोगी अव्ययें (पुढें चालू).

१२३. वर सांगितलेल्या शब्दयोगी अव्ययांखेरीज दुसरीं पुष्कळ आहेत. त्यांपैकीं मुख्य खालीं दिलीं आहेत.

On, upon, above, over, below, beneath, under, after, behind, before, about, round, around, among, amongst, amidst, between, during, along, beside,

---

* A pair of shoes=जोडा.

† दर किंवा भाव दर्शविण्याकरितां at ह्याचा प्रयोग करतात.

‡ मित्रांचा वियोग झाला असतां.

§ गांठ पडली, येऊन धडकलीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

besides, without, except, across, beyond, through, concerning, respecting, toward, towards, with, by, instead of, against.

१२४. On आणि upon हीं अव्ययें मुख्यत्वेंकरून **आश्रय** दाखवितात—ह्मणजे, एक पदार्थ दुसऱ्याच्या वर असून त्याला त्याचा खालून आश्रय किंवा टेंकू आहे, असा त्यांचा अर्थ होतो;* जसें—

The book is *on* the table.

पुस्तक मेजावर आहे.

Above चे दोन अर्थ होतात. १. **उंच डोक्यावर.** २. कोणत्याही अंशीं **श्रेष्ठ** किंवा **अधिक**; जसें—

Birds fly *above* the earth.

पृथ्वीच्या वर पक्षी उडतात.

The weight is *above a s'er.*

वजन एका शेरावर आहे.

Over ह्याचे अर्थ तीन. १. **उंच स्थळीं असणें.** २. कोणत्याही अंशीं **श्रेष्ठ.** ३. पदार्थाच्या पृष्ठभागावरून **गमन.** उदाहरणें—

The clouds are *over* our heads.

आपल्या डोक्यावर ढग आहेत.

I will make thee ruler *over* many nations.

मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा अधिपति करीन.

---

* ज्याच्यावर एकादा पदार्थ आहे किंवा ठेवायाचा आहे तें भुईपेक्षां उंच ठिकाणीं असलें तर upon हें अव्यय योजावें, नाहीं तर on हें लावावें. (पाठ २२ ह्यांतील इंग्रेजी वाक्यें पहा). परंतु हा नियम सर्वत्र पाळतात असें नाहीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

He wandered *over* the earth.

तो पृथ्वीवर भटकत असे.

१२५. Below आणि beneath ह्या दोहोंचे अर्थ **पदार्थांच्या खालीं** व **कमी योग्यतेचा** असे होतात; परंतु beneath चा मुख्य अर्थ पहिला होय आणि तो शब्द on व upon ह्यांच्या उलट अर्थाचा आहे. उदाहरणें—

We found a scorpion *beneath* the stone.

आह्मांला दगडाखालीं विंचू सांपडला.

He is always *below* me in the class.

तो वर्गांत नेहमीं माझ्या खालीं असतो.

Under चा अर्थ साधारण रीतीनें **खालीं** असा होतो.

१२६. After आणि behind= **मागें, पाठीमागें.** परंतु **लगत पाठीमागल्या जागीं** अशा अर्थीं बहुतकरून behind ह्याचा उपयोग करावा. After ह्याचा अर्थ **नंतर** असाही होतो. उदाहरणें—

Walk *behind* me.

माझ्या मागें चाल.

I went out *after* dinner.

मी जेवल्यावर बाहेर गेलों.

१२७. Before*=**पुढें** आणि **पूर्वीं.**

---

* Before ह्याचा समक्ष असाही अर्थ होतो. He wrote *before* me. ह्या वाक्याचे दोन अर्थ होऊं शकतात—१. त्यानें माझ्या पूर्वीं लिहिलें. आणि २. त्यानें माझ्या समक्ष लिहिलें. ह्मणून संशय काढून टाकण्याकरितां पहिल्या अर्थी He wrote before I wrote असें ह्मणावें हें अधिक चांगलें. समक्ष ह्या अर्थी presence हा शब्द घालण्याचा फार प्रघात आहे; जसें—माझ्या समक्ष—in my presence.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

Stand *before* me.

माझ्या पुढें उभा रहा.

I got up *before* sunrise.

मी सूर्योदयापूर्वीं उठलों.

१२८. About, round आणि around, **भोंवतालीं, सभोंवतीं.** About चे दुसरे अर्थ **सुमारें** आणि **विषयीं** असे होतात. उदाहरणें—

The earth moves *round* the sun.

पृथ्वी सूर्यासभोंवतीं फिरते.

He went out at *about* three o'clock.

तो तीन वाजायाच्या सुमारास बाहेर गेला.

What does he say *about* me?

तो मजविषयीं काय ह्मणतो?

१२९. Among आणि amongst=**मध्यें, आंत.**

Blessed art thou *among* women?

स्त्रियांमध्यें तूं धन्य आहेस?

Amid आणि amidst हे शब्द त्याच अर्थाचे आहेत असें ह्मटलें तरी चालेल.*

He behaved like a hero amidst *these* difficulties

ह्या अडचणींमध्यें तो वीरासारखा वागला.

---

* Among हें अव्यय बहुतकरून साधारण अर्थीं मध्यें ह्मावद्दल आणि amidst हें मधोमध ह्या अर्थीं योजावें. तसेंच among ह्याच्या पुढें बहुतकरून व्यक्तिवाचक नामें आणि amidst ह्याच्या पुढें भाववाचक व तसल्या प्रकारचीं दुसरीं नामें येतात. खेरीज among हें अव्यय प्रायः सजातीय व्यक्तींमध्यें आणि amidst हें विजातीय व्यक्तींमध्यें ह्या अर्थीं योजावें. परंतु हे सूक्ष्म भेद नेहमीं राखलेले असतात असें नाहीं व ह्या अव्ययांचा उपयोग, इंग्रजी पुस्तकें वाचीत गेल्याशिवाय, एकाएकीं साफ लक्षांत यावयाचा नाहीं.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

Between=दोन पदार्थांच्या मध्यें, दरम्यान.

The river Tweed is *between* England and Scotland.

इंग्लंड व स्काटलंड ह्यांच्या मध्यें ट्वीड नदी आहे.

During चा अर्थ अमुक अवधींत असा होतो; जसें—

We must live virtuously *during* our earthly pilgrimage.

संसाररूपी यात्रेंत आपणांला नेकीनें राहिलें पाहिजे.

१३०. Along=बाजूनें, अमुक मार्गानें.

The soldiers marched *along* the river.

शिपाई लोक नदीच्या बाजूनें गेले.

Beside=जवळ, बाजूस, पाशीं.

Sit down *beside* me.

माझ्या जवळ बैस.

१३१. Besides=शिवाय, खेरीज, आणखी. अमुक पदार्थ धरून किंवा घेऊन आणखी असा ह्या अव्ययाचा अर्थ होतो; जसें—

Besides the gain, he got the honour.

नफा होऊन शिवाय त्याला मान मिळाला.

Except आणि without=शिवाय, वांचून. ह्यांचा अर्थ अमुक पदार्थ सोडून किंवा खेरीज करून असा होतो; जसें—

I found everything *except* my pen-knife.

मला माझ्या चाकूखेरीज सर्व जिनसा सांपडल्या.

Many men like to live *without* labour.

पुष्कळ लोकांला कष्टावांचून राहणें आवडतें.

१३२. Across=वरून, पार, एका बाजूपासून दुसऱ्या बाजूपर्यंत; जसें—

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

They built a bridge *across* the river.

त्यांनीं नदीवर पूल बांधला.

Beyond=पलीकडे.

I saw a stag *beyond* the river.

मीं नदीपलीकडे एक काळवीट पाहिला.

१३३. Through=मधून, आंतून. २. मुळें.

The water runs *through* the pipes.

नळांतून पाणी वाहतें.

It happened *through* pure carelessness.

शुद्ध बेपरवाईपणामुळें हें घडलें.

१३४. Concerning आणि respecting=विषयीं.

I wrote to you *concerning* that matter.

मीं तुला त्या गोष्टीविषयीं लिहिलें.

१३५. Toward आणि towards=कडे.

The troops moved *toward* the city.

लष्कर शहराकडे चाललें.

१३६. With ह्या अव्ययावरून करणी व साहित्यार्थी तृतीयेचा अर्थ होतो. By ह्यावरून मराठींत तृतीयान्त कर्त्याचा किंवा साधनाचा बोध होतो; जसें—

He cut himself *with* a knife.

त्यानें आपल्याला चाकूनें जखम करून घेतली.

I will come *with* you.

मी तुझ्याबरोबर येईन.

This letter is written *by* Râmâ.

हें पत्र रामानें लिहिलें आहे.

They took the country *by* force.

त्यानीं देश बळजोरीनें घेतला.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

१३७. Instead of=च्या जागीं, बद्दल. Against =विरुद्ध.

१३८. शब्दसंग्रह २२.

गरुडपक्षी,	an eagle.	वीस,	twen'ty.
खडक,	a rock.	अगदींच,	altogeth'er.
धूर,	smoke.	ओझें,	a bur'den.
जूं, जोकड,	a yoke.	पृष्ठभाग,	a sur'face.
दास्य,	the yoke of slavery.	पदवी,	a rank.
मैदान,	a plain.	ओघ, रेघ, रांग,	a line.
उशी,	a pil'low.*	एकप्रकारचावृक्ष,	an oak.
दोर,	a rope.	प्रवाह,	a stream.
रहाट,	a wind'lass.	आरोप,	a charge.
तपकीर,	snuff.	सिद्धि, जय,	a success.
अनुयायी, शिष्य, सेवक,	a fol'lower.	सामर्थ्य, शक्ति,	pow'er.
बेत, उद्देश,	inten'tion.	समज, समजणें,	comprehension.
कळप,	a flock.	झाडी,	a thicket.
काम, कार्य,	an affair'.	कायदा, हुकूमनामा,	a decree.
किल्ला,	a cas'tle.	मत, विचार,	opin'ion.
भागीदार,	a part'ner.	हित,	the in'terest.
विस्तव, आग,	fire, a fire.	सण,	a hol'iday.
खंदक, खांच,	a ditch.	इच्छा,	wish.
बांक,	a bench.	देवडीवाला,	a porter.
दस्तऐवज,	a doc'ument.	चेंडू,	a ball.
सुपीक,	fer'tile.	पहारा करणें, नजर ठेवणें,	to watch.

* खुर्च्या वगैरे बसण्याची ठिकाणें ह्यांवर ठेवलेल्या गिर्द्यांला cushions ह्मणतात.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

विभागणें, वांटणें, to divide'. सार्वजनिक, लोकांचा, } pub'lic.
कवाइतीनें थाटानें } चालणें, to march. उंच, high.
वांटा-घेणें-मिळणें, to share. जलमार्गानें जाणें, to sail.
स्तुत्य, commend'able. निराळ्या रीतीनें, di'fferently.

यथामार्गानें चालणें, To do right.
सत्ता चालविणें, To exercise authority.
रपेट करणें, To take exercise.
एकामागून एक, One after another.

भाषांतरपाठ २२.

१३९.—१. The table stands* *on* the floor. २. We lie† *on* a bed. ३. Your turban is lying *on* the ground. ४. We are standing *upon* the ground. ५. Rain falls down *on* the earth. ६. He fell down *on* a stone. ७. London is *on* the banks of the Thames. ८. His hat is *upon* his head. ९. The eagle is sitting *upon* the rock. १०. What bird is that *upon* the roof of our house ? ११. I saw some beautiful stones *upon* the hill. १२. Cattle live *upon* grass. १३. The price of virtue is *above* rubies. १४. God is *above* the skies.‡ १५. The smoke rises *over* the city. १६. The English people exercise authority *over* many peoples.§ १७. A boat was sailing *over* the lake.

---

* To stand ह्याचा अर्थ कधीं कधीं 'असणें' असा होतो.

† To lie ह्याचा अर्थ निजणें असा येथें आहे.

‡ Sky व heaven ह्यांच्या बहुवचनाचा अर्थ एकवचनासारखाच होतो.

§ People ह्या शब्दाचा अर्थ एकाच मंडळीचे, गांवाचे, शहराचे किंवा राष्ट्राचे लोक असा असतो तेव्हां तो एकवचनी असतो; परंतु निरनिराळ्या राष्ट्रांचे किंवा जातींचे लोक असा असतो तेव्हां बहुवचनी असतो.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

१८. The dog leaped *over** the table. १९. Watch *over* your children. २०. Dost Thou not see my sins? २१. I placed the pillow *beneath* my head. २२. Where do you keep your books? २३. The country sank† *beneath* the yoke. २४. He is sinking *beneath* the burden. २५. Brutes are *below* man. २६. The rocks are twenty feet *below* the surface of the water. २७. He will do nothing *beneath* his rank and character. २८. They placed the men in a line one *after* another. २९. I came *after* him. ३०. Many men in England think differently *about* this matter. ३१. The fertile plains of India lay‡ *before* them. ३२. We saw the river Godávari *before* us. ३३. I saw a wall *around* that city. ३४. We went *around* the city. ३५. They stood *around* him. ३६. Wind the rope *round* this windlass. ३७. Everything *about* him is in order. ३८. Have you got your snuff-box *with* you? ३९. The nobleman had *about* twenty followers. ४०. No man *among* them understood our intention. ४१. The shepherd stood in the midst‖ of his flock. ४२. Two friends are of one mind. ४३. He divided a rupee *between* them. ४४. The soldiers were standing *between* the two oaks. ४५. The troops marched *along* the bank of the river. ४६. The holy man was standing *beside* the stream. ४७. They brought many other charges *besides* this against the prisoner.

---

* over चा अर्थ पलीकडे असा कधीं कधीं होतो.

† To sink=वसणें, खचणें.

‡ To stand ह्याच्या प्रमाणें to lie ह्याचा अर्थ असणें असा कधीं कधीं होतो.

‖ येथें midst (मध्यस्थळ) हें नाम मानावें, नाहीं तर in the midst of हें संयुक्त शब्दयोगी अव्यय मानावें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kath

Public Domain. Digitization by eGangotri.Fund

४८. Wise men will do right *without* a law. ४९. They fought *without* success. ५०. The army marched twenty miles *beyond* the river. ५१. It is entirely *beyond* our power. ५२. His conduct is *beyond* my comprehension. ५३. They have slain their fellow-creatures *through* thirst for gold.* ५४. Fishes move *through* the water. ५५. The wolf ran *through* the thicket. ५६. His hand will be *against* every man. ५७. This is a decree *against* law and public opinion. ५८. This ship was sailing *against* the wind. ५९. He spoke to me *concerning* this affair. ६०. Your conduct *toward* us is commendable. ६१. We then marched *towards* the castle. ६२. We fought *with* the enemy for an hour. ६३. The gentleman travelled *with* me from Calcutta to Bombay. ६४. He wounded himself *with* a knife. ६५. The merchant shares the profits *with* the other partners. ६६. The soldiers destroyed the city *by* fire. ६७. Are the interests of the people of Manchester *against* those of the people of India?

१. दिवाळीच्या† सुमारास ते आमच्या घरीं आले. २. माझी खोली तुझ्या खोलीच्या वर आहे. ३. मी शेतांतून गेलों. ४. ती गोष्ट माझ्या इच्छेविरुद्ध घडली. ५. तुमच्या बरोबर तो उंच‡ मनुष्य कोण होता? ६. आकाश उंच आहे. ७. तें आपल्या डोक्यावर¶ आहे. ८. स्काट्लंड देशांत

---

* Gold ह्याचा अर्थ कधीं कधीं द्रव्य, पैसा असा होतो.

† दिवाळी= The Div'ali holidays.

‡ ज्या वस्तूंची उंची वरीच असून जाडी विशेष नसते त्यांस tall हा शब्द लागतो. विशेषेंकरून माणसें, झाडें, डोलकाठ्या व उभारलेल्या मोठ्या काठ्या ह्यांला तो शब्द लागतो. High हा शब्द वस्तूंला मात्र लागतो.

¶ अर्थ असेल त्याप्रमाणें on किंवा above हें अव्यय घालावें.

Sanskrit University, Balmeeki Campus, Kathm

ublic Domain. Digitization by eGangotri.Fund

